रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३६०
www.ramprahar.com
गुरुवार १७ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

कोकणातील वीज समस्या सोडवण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करा -राज्यमंत्री मेघना बोर्डीकर/२ | पनवेल महापालिका शाळांतील मुलांना व्यासपीठ, व्यक्तिमत्व विकासाची संधी/६ | इंग्लंडच्या डब्ल्यूटीसी गुणांना आयसीसीकडून कात्री/८

# विकास प्रकल्पांसोबतच शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांचे रक्षण करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची विधानसभेत मागणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणूक आणि उद्योग निर्माण करण्यावर भर देत आहे. विमानतळ, एज्युसिटी, मेडिसिटी, स्पोर्ट्ससिटीसारखे प्रकल्प तसेच कोस्टल रोड, अटल सेतू, मेट्रो यांसारख्या सुविधा राज्याच्या औद्योगिक आणि सामाजिक प्रगतीला चालना देणार आहेत, पण या विकासात शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांचे रक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे असून त्यांना न्याय देण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याची भूमिका आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत स्पष्टपणे मांडली.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र सरकारचे कौतुक, राज्यातील गुंतवणूक, विमानतळ प्रकल्प, नैना प्रकल्पाचा आढावा घेत सिडकोच्या भूमिकेवर टीका आणि शेतकरी प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांविषयी नियम २९३ अन्वये प्रस्तावावर मुद्देसूद भाष्य केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळात बोलताना सांगितले की, सर्वात आधी या राज्याचे तरुण आणि तडफदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारचे मी मनः पूर्वक अभिनंदन करतो, कारण राज्यांमध्ये परकीय थेट गुंतवणूक आणि पूर्ण देशभरात स्टार्टअपच्या बाबतीत आपला महाराष्ट्र हा देशामध्ये आघाडीवर असल्याचे समोर आलेले आहे आणि या माध्यमातून २०४७ सालापर्यंत विकसित भारत घडवण्यासाठी विकसित महाराष्ट्र हा तोलामोलाची साथ देणार आहे. जर आपल्याला सन २०३०पर्यंत पाच ट्रिलियनची डॉलरची इकॉनॉमी साध्य करायची असेल, तर एक ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी महाराष्ट्राची झाली पाहिजे यासाठी मुख्यमंत्री प्रयत्न करतायेत आणि या दृष्टिकोनातून एकीकडे परकीय गुंतवणूक आणणे आणि त्याचबरोबर राज्यात वेगवेगळ्या पद्धतीचे रिफॉन्ससाठी मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारचा पूर्ण पाठपुरावा सुरू आहे. या अनुषंगाने राज्यभरात वेगवेगळे महत्त्वाचे प्रकल्प येत आहेत. त्यामुळे राज्य एकाच वेळेला औद्योगिक आणि त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये कात टाकत आहे. **(पान २ वर..)**

# पीएम धन-धान्य कृषी योजनेला मोदी सरकारची मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी (दि. १६) पीएम धन-धान्य कृषी योजनेला मंजुरी दिली. या योजनेचा देशातील १.७ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.



या योजनेंतर्गत देशाभरातील १०० जिल्ह्यांची निवड केली जाणार आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये उत्पादकता कमी आहे, त्यांचा या १०० जिल्ह्यांमध्ये समावेश केला जाईल. प्रत्येक राज्यातील किमान एक जिल्हा समाविष्ट होईल. कृषी जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार ३६ केंद्रीय योजनांच्या समन्वयातून दरवर्षी २४ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या योजनेची घोषणा केली होती. आता केंद्र सरकारने पुढील सहा वर्षांसाठी या योजनेस मंजुरी दिली आहे. पिकांच्या कापणीनंतर साठवण क्षमता वाढवण्याच्या कामात या योजनेचे मोठे योगदान असणार आहे. पेरणीच्या सुविधांमध्येही शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळणार असून देशातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होईल. ही योजना नीती आयोगाच्या 'आकांक्षी जिल्हे' कार्यक्रमापासून प्रेरित आहे.






## निवडक

### पित्याचे मुलाच्या गळ्यावर ब्लेडने वार

**पनवेल :** दारूच्या नशेत आई-वडिलांशी सतत भांडण करणाऱ्या मुलाच्या गळ्यावर त्याच्या वडिलांनी रागाच्या भरात ब्लेडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना कामोठेत घडली आहे. या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर कामोठे पोलिसांनी मुलावर हल्ला करणाऱ्या पित्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

### ट्रक हातावरून गेल्याने तरुण जखमी

**पनवेल :** वार्ताहर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकी घसरली व ३३ वर्षीय दुचाकीस्वार रस्त्यावर पडला. याच वेळी शेजारुन भारत गॅस कंपनीचा ट्रक या तरुणाच्या हातावरून गेल्याने दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना घडली. प्रणव ठाकूर असे या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी ट्रक चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रणव ठाकूर हा रोडपाली येथे राहत असून रात्री १०.३० वाजता सीईटीपी प्लांट तळोजा एमआयडीसी येथे तो त्याच्या दुचाकीने जात होता. पाऊस पडत असल्याने तो हळूहळू दुचाकी चालवत होता. दरम्यान, रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याचा त्याला अंदाज न आल्याने त्यांची दुचाकी खड्ड्यात घसरुन तो खाली पडला. या वेळी वेगाने आलेल्या भारत गॅस ट्रकचे चाक त्यांच्या उजव्या हातावरून गेले आणि तो गंभीर जखमी झाले. त्यानंतर ट्रक चालक पळून गेला. या प्रकरणी प्रणव याने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी ट्रक चालकाविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे.

### तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** खारघरमधील ओवे कॅम्प तलावात बुडून अमन यादव (वय १८) या महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे . मृत तरुण विद्याविहार येथील एस. के. सोमय्या महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे निदर्शनास आले. मुंबई-चुनाभट्टी परिसरातील सात ते आठ तरुण खारघरमधील धबधब्यावर आनंद घेण्यासाठी आले होते. पांडवकडा धबधब्यात प्रवेश मनाईमुळे हे तरुण ओवे कॅम्प येथील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या तलावात अंघोळ करताना एक तरुण बुडाल्याची माहिती खारघर अग्निशमन जवानांना मिळाली. अग्निशमन पथकाकडून तलावात गळ टाकून मुलाचा शोध घेतला असता त्याचा मृतदेह आढळला

### औषधाच्या दुकानातून १७ हजारांची चोरी

**पनवेल :** औषधाच्या दुकानाचे शटर वाकवून आत शिरलेल्या चोरट्याने या दुकानाच्या गल्ल्यातून १७ हजार रुपये आणि काही औषधे चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद केला आहे. हर्ष नावंधर यांचे नवीन पनवेल, शॉप नंबर १४, हरी आशीर्वाद अपार्टमेंट, सेक्टर १५ ए येथे जनरिक मेडिको नावाचे औषधाचे दुकान आहे. त्यांच्या मेडिकलमध्ये चोरी झाल्याचे त्यांना समजल्यानंतर त्यांनी या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# कोकणातील वीज समस्या सोडवण्यासाठी दर्जेदार व कालबद्ध आराखडा तयार करा -राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील वीजपुरवठा अधिक सक्षम, नियमित व तक्रारमुक्त होण्यासाठी कोकणातील वीज विभागाच्या कामांचा दर्जेदार व कालबद्ध आराखडा तयार करा, अशा सूचना ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या. विधानभवनात कोकण विभागातील ऊर्जा विभागाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.



या बैठकीला गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री दीपक केसरकर, आमदार प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, निलेश राणे, महेंद्र दळवी, विद्युत विभागाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, कोकण विभागातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबूत व्हावी, विशेषतः येणाऱ्या गणेशोत्सव कालात वीज खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करावे.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी पुढे म्हटले की, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात चालू असलेल्या कामांची माहिती स्थानिक आमदारांना दिली जावी. कामामध्ये पारदर्शकता व सहभाग सुनिश्चित करावा. स्मार्ट मीटर संदर्भात जनजागृतीसाठी अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी संपर्क साधावा. नागरिकांना या योजनेचे फायदे समजावून सांगावे. वाढत्या मागणीमुळे नव्या सबस्टेशनचे नियोजन करावे. तेथील पायाभूत सुविधांचा विस्तार करावा. मनुष्यबळ वाढवावे. कोकणातील वीज विभागाच्या दुरुस्ती तसेच नवीन कामकाजासाठी दर्जेदार व कालबद्ध कार्यक्रम आखण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी, विभागातील सर्व दुरुस्ती आणि नवीन कामे ठराविक कालमर्यादेत पूर्ण करावीत. गुणवत्तेचा उच्च दर्जा राखला जावा. गणेशोत्सव व अन्य सणांसाठी वीज सुरळीत ठेवावी. उत्सव, सण काळात वीज खंडित होणार नाही याची काळजी घ्यावी, असे सांगितले. या वेळी आमदारांनी आपल्या मतदारसंघातील ऊर्जाविषयक समस्या सांगितल्या.

## गव्हाण विद्यालयात शाळा व्यवस्थापन समिती गठीत

### शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत अध्यक्षपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे शालेय स्तरावरचे विविध समित्यांचे विलीनीकरण करून केवळ चार समित्यांची स्थापना यावेळी करण्यात आली.त्यामध्ये प्रामुख्याने सर्व समित्यांचे सनियंत्रण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली.या समितीच्या अध्यक्षपदी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली



रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यासाठी शिक्षक,पालक व स्थानिक शाळा समितीचे सदस्य यांची संयुक्त सहविचार सभा विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या सहविचार सभेस विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर,शिक्षक पालक संघाचे माजी उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर व अध्यक्ष कुंदन मोकल,न्हाव्याचे माजी सरपंच हनुमंत भोईर, विद्यालयाचे उपप्राचार्य विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशीकला पाटील,संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर,ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर,ए.आय.प्रमुख शितलकुमार म्हात्रे तसेच पालक,शिक्षक व अन्य मान्यवर उपस्थित होते. यापूर्वीच्या शालेय स्तरावरच्या विविध समित्यांचे विलीनीकरण शाळा व्यवस्थापन समिती,सखी सावित्री समिती,महिला तक्रार निवारण समिती,विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती या चार समित्यांमध्ये करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात अरुणशेठ भगत यांनी पालकांना मार्गदर्शन करताना आपला सक्रीय सहभाग विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी पोषक ठरेल असे प्रतिपादन केले तर प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी आपल्या भाषणात सर्व समित्यांच्या कार्याचे संक्षिप्त विश्लेषण केले. ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले तर उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी आभार मानले. नविन समित्या. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत अध्यक्ष पदावर विराजमान झालेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी पालक सदस्य रविंद्र भोईर यांची तर अन्य सदस्यांमध्ये रत्नप्रभा घरत,बाबुराव कांबळे,कुंदन मोकल,शुभांगी घरत,प्रगती कोळी,सुजाता ठाकूर,सविता घोलप,रेश्मा हरिदास कोळी,तुकाराम वाघे,अनिल कडू, संजय म्हात्रे,प्रशांत नाईक,ऋषिकेश म्हात्रे आदींची प्रवर्गनिहाय सदस्य म्हणून तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून चारुशीला ठाकूर यांची निवड करण्यात आली असून विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर या समितीच्या पदसिद्ध सचिव असतील. सखी सावित्री समितीच्या रचनेप्रमाणे अरुणशेठ भगत अध्यक्ष असलेले या समितीच्या महिला शिक्षक प्रतिनिधी म्हणून एच.आर.पाटील व अन्न सदस्यांमध्ये किशोरी जितेंद्र कोळी, प्रिया सागरकडून व अन्य सदस्यांची निवड करण्यात आली.या समितीच्या सदस्य सचिव म्हणून मुख्याध्यापिका या समितीच्याही सदस्य सचिव असतील तर महिला तक्रार निवारण निवारण समितीच्या अध्यक्षपदाची धुराही त्याच सांभाळतील.शाळा स्तर विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती देखील समिती लवकरच गठीत करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## ‘एमआयडीसीमध्ये भविष्यात बहुमजली पार्किंगचा विचार’

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रांत (एमआयडीसी) पार्किंगची समस्या दिसून येत असून यासाठी सध्या एमआयडीसीकडील मोकळ्या जागेचा वापर केला जाईल. भविष्यात बहुमजली पार्किंग सुविधा निर्माण करण्याबाबत विचार करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य विक्रांत पाटील यांनी तळोजा एमआयडीसीमधील पार्किंगची समस्येबाबत प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, तळोजा ही मोठी एमआयडीसी आहे. येथे येणाऱ्या वाहनांची संख्यादेखील मोठी आहे. सध्या येथे १४० पार्किंगची सुविधा उपलब्ध असून अधिकच्या पार्किंगसाठी एमआयडीसीने जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

पान १ वरुन

## विकास प्रकल्पांसोबतच शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांचे रक्षण करा

याचा परिणामही राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून संपूर्ण राज्य मग ते कोकण असेल पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा विदर्भ, उत्तर महाराष्ट्र प्रत्येक विभागामध्ये होत महाराष्ट्र सर्व क्षेत्रात पुढे जाताना दमदार पावले टाकतो आहे. या अनुषंगाने पनवेल आणि परिसरात नवीन विमानतळ येत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी गेल्या आठवड्यामध्ये या विमानतळाला भेट दिली आणि कामाची पाहणी करताना ३० सप्टेंबरपर्यंत ही सर्व कामे होणार याची खात्री करून घेतलेली आहे. या विमानतळामुळे खूप मोठ्या प्रमाणावर पनवेल परिसराचा विकास होणार आहे तसा तो महाराष्ट्राचा आणि देशाचा होणार आहे. एक विमानतळ ज्या वेळेला येते त्या वेळेला देशाची अर्थव्यवस्था एक टक्क्याने वाढते. गेल्या वर्षी देशाचा जीडीपी हा ३३० लाख कोटी होता. तीन-तीन लाख तीस हजार कोटीने जर देशाचा जीडीपी वाढणार असेल, तर आम्हाला खात्री आहे मुख्यत्वे रायगड जिल्हा पनवेल तालुक्यामध्ये हा वाढलेला जीडीपी वेगवेगळ्या गुंतवणुकीच्या उद्योगाच्या माध्यमातून पहायला मिळतो आणि याच्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय मोलाचे प्रयत्न केले आहेत. सन २०१४पासून सुरू असणाऱ्या या प्रयत्नामध्ये त्यांना पंतप्रधान कार्यालयाची तितकीच मोलाची साथ मिळाली आहे. विमानतळ होईल, पण त्या विमानतळामुळे विविध पद्धतीच्या संधी एक्सपोन्शनली या परिसरात वाढणार आहेत आणि त्यामुळे या परिसरात निर्माण होणाऱ्या उद्योगांमध्ये स्थानिकांना जास्तीत जास्त फायदा मिळाला पाहिजे. मुख्यमंत्री महोदय या दृष्टिकोनातून प्रयत्न करत असून या विमानतळाच्या परिसरात वेगवेगळ्या पद्धतीची नगरे वसवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. एज्युसिटी, मेडिसिटी, स्पोर्ट्ससिटी या ठिकाणी उभारल्या जाणार आहेत. जागतिक दर्जाच्या पाच युनिव्हर्सिटी येथे एज्युसीटीच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याचे काम करणार आहे.

या सगळ्यामुळे रोजगार स्वयंरोजगाराच्या वेगवेगळ्या संधी परिसरात निर्माण होत आहेत. अर्थातच, याला जोड अटल सेतू, कोस्टल रोड, मल्टी मॉडेल कॉरिडोर असून मेट्रोचे जाळे या परिसरात निर्माण होत आहे आणि याच्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर नव्या पायाभूत सुविधा निर्माण होत आहेत. पनवेल महापालिका असेल किंवा एमएमआरडीएच्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदय ज्याचा उल्लेख करतात ती तिसरी मुंबई आणि नैना या सगळ्यावर एक मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येच्या अनुषंगाने ताण येणार आहे. वाढती लोकसंख्या, प्रकल्पाच्या अनुषंगाने विजेची, पाण्याची मागणी वाढते. आजच या परिसरात पाण्याचा तुटवडा जाणवतोय तसाच विजेच्या बाबतीमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर हेसुद्धा तितक्या तोलामोलाचे निर्माण होण्याची आवश्यकता आहे. हा जो परिसर, कोस्टल रिजन आहे त्यामुळे या परिसरात वादळामुळे अनेक वेळा नुकसान होते आणि ओव्हरहेड वायर्स याचा नेटवर्क तुटून पडते. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागाला मोठा फटका बसतो. या सगळ्या वाहिन्या भूमिगत करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून केंद्र सरकार असेल, राज्य सरकार असेल यांच्या माध्यमातून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निधी देण्याची आवश्यकता आहे.

सिडको या परिसरात अनेक क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण आहे. या परिसरामध्ये लोकांनी गावठाणाच्या भोवती जी घरे बांधली त्या घरांच्या खालच्या जमिनी या नियमित करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यामध्ये निर्णय घेतला, पण या जागा जर लीज होल्ड राहिल्या, तर खऱ्या अर्थाने त्या प्रकल्पग्रस्ताला त्याचा फायदा मिळू शकणार नाही. म्हणून या जागा फ्री होल्ड झाल्या पाहिजेत आणि त्या प्रकल्पग्रस्ताच्या कायम मालकीच्या जागा झाल्या पाहिजेत यासाठी आजच या दृष्टिकोनातून आवश्यक ती उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. याचबरोबर नैना परिसरात शासनाने १ ते ११ स्कीम जाहीर केल्या, पण टीपी स्कीम जाहीर करत असताना याच्यामध्ये लँड पुलिंग स्कीम राबवलेली आहे. या लहान पुलिंग स्कीममध्ये ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन ही स्वयंस्फुर्तीने विकासासाठी समोर आली पाहिजे त्याला मात्र सिडको विश्वासात घ्यायला तयार नाही. नैना हा प्रकल्प ज्या ठिकाणी येणार आहे त्या प्रकल्पाच्या या ठिकाणी खरेतर शेअर होल्डर असायला पाहिजे, जो प्रकल्पग्रस्त असल्याची भावना व्यक्त करतोय त्यांच्यामध्ये मोठी नाराजी आहे. शेतकऱ्याची ६० टक्के जमीन सिडको घेणार; मग त्याच्या गावातल्या घरावरच तो प्लॉट टाकण्याचा अट्टाहास का केला जात आहे, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला. घरे कसे वाचतील याचा प्रयत्न करतोय, पण अद्यापही त्या परिसरात राजकीय विरोधकांकडून टीका-टिप्पणी केली जाते. शेतकऱ्यांना घरे तुटतील अशी भीती दाखवली जाते. सिडको अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून या अधिकाऱ्यांची जी हुकूमशाही प्रवृत्ती आहे ती बदलण्याचा प्रयत्न लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही करतोय आणि या दृष्टिकोनातून त्या शेतकऱ्यांना आश्वस्त करण्याची आवश्यकता आहे की तुझ्या घरावर कुठली कारवाई होणार नाही. त्याचे घर गावठाणात असू द्या अथवा गावठाणाच्या बाहेरच असू द्या ते त्याच्या स्वतःच्या जागेत असेल, तर त्याला कुठलाही धोका नाही हे आश्वासन करण्याची आवश्यकता आहे. टीपी स्कीमच्या माध्यमातून जे प्लॉट दिले जातात या प्लॉटमध्येसुद्धा त्याला त्याचा प्लॉट त्याच्या जमिनीवर न बसवता कमी महत्त्वाच्या ठिकाणी लांब दूरवर दिला जातोय आणि त्यातून त्याच्या मनामध्ये चिडीची भावना निर्माण होते. त्याला तुम्ही प्लॉट देता त्याला जर एफएसआय कंज्युम होणार नसेल तर त्याचे नुकसान होत आहे. मग शेतकऱ्याची मागणी ४० टक्के का ६० टक्के द्या, त्याहीपेक्षा जास्त द्या अशी आहे आणि या बाबतीत प्रकल्पग्रस्तांना खात्री देण्याची आवश्यकता आहे तसेच प्रकल्पग्रस्ताचा त्याचा प्लॉटधारकाचा प्लॉटवर त्याला अनुदेय एफएसआय वापरता येणार नसेल तर त्याला त्याचा पूर्ण एफएसआय वापरेपर्यंत जितका एरिया लागेल किंवा तितका एरिया हा त्याला त्या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. याच्या व्यतिरिक्त शेतकऱ्याला या ठिकाणी दिलेले प्लॉट हे कमी रूंदीच्या रस्त्यावर आणि विकसकाला त्यांचे प्लॉट मोठ्या रस्त्यावर हा अन्याय कशासाठी, असा प्रश्नही या निमित्ताने त्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्याला मी याच्यामध्ये शेअर होल्डर आहे असे अभिमानाने गौरवाने उल्लेख करता आला पाहिजे या दृष्टिकोनातून सिडकोने जाणीवपूर्वक लक्ष देऊन शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याची आवश्यकता आहे आणि म्हणून आरबी ट्रेटरने जरी चुकीचे निकाल दिले तरीसुद्धा या शेतकऱ्यांच्यासोबत पुन्हा प्रत्येक टीपी स्कीममध्ये गावनिहाय बैठका घेऊन या दृष्टिकोनातून शेतकऱ्याला आश्वस्त करण्याची गरज आहे तसेच या अनुषंगाने या शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून ज्या ठिकाणी त्यांचे प्लॉट जमिनीपासून लांब दिलेत त्यांना त्यांच्या स्वतःच्या शेतामध्ये प्लॉट देण्याची आवश्यकता आहे. गावाभोवती नगर वसवले जाणार आहे, त्यांना ज्या प्रकारे सोयीसुविधा दिल्या जाणार आहेत त्याचप्रमाणे या गावांच्या भोवती सार्वजनिक सोयीसुविधा या ठिकाणी केल्या पाहिजेत आणि त्या माध्यमातून ते गावसुद्धा अन्य शहरांसारखेच सर्व सुविधांनी युक्त असले पाहिजे. एक मोठे शहर नैनाच्या माध्यमातून उभारले जाणार आहे तर त्यासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांचे जमिनीच्या बाबतीमध्ये पूर्णपणे समाधान होण्याची आवश्यकता आहे. तरच असा प्रकल्प साकारला जाऊ शकतो आणि तरच या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांना अपेक्षित असलेल्या या परिसराचा विकास करता येईल. या सगळ्या परिसरामध्ये ज्या पद्धतीने नवनवे प्रकल्प येतात. या प्रकल्पामध्ये या ठिकाणी तळोजा नवी औद्योगिक वसाहत येत आहे आणि त्या अनुषंगाने तिथल्या प्रकल्पग्रस्तांना रोजगाराच्या संधी मिळाल्या पाहिजेत. तिथे स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या पाहिजेत. रोजगारासाठी आवश्यक प्रशिक्षण हे एमआयडीसी असेल, सिडको असेल यांनी निर्माण केले पाहिजे आणि यासाठी मला खात्री आहे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचंड प्रमाणामध्ये सकारात्मक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार सकारात्मक आहे. फक्त खालचे जे प्रशासन आहे मग ते सिडको असेल किंवा अन्य प्रशासन असेल त्यांना या दृष्टिकोनातून ताळ्यावर आणून सकारात्मक पावले उचलण्याची गरज आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळात अधोरेखित करून शेतकरी, प्रकल्पगस्त नागरिकांची बाजू स्पष्टपणे मांडली.

## केटीएसपी मंडळाविरोधात संचालकांनीच दंड थोपटले!



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हात शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या खालापूर शिक्षण मंडळाचा अनागोंदी कारभार होत असल्याचा आरोप करीत ज्येष्ठ संचालकांनीच संस्थेच्या कारभाराविरोधात दंड थोपटल्यामुळे संस्थेच्या कारभारात सारेच अलबेल नाही, असे दिसून येत आहे.

संस्थेतील यशवंत साबळे या संचालकांनी याबाबत अनेकदा लेखी पत्र देऊन ही संस्था अध्यक्षांनी याबाबत मौन पाळल्यामुळे संशयाचे ढग अधिक गडद होत चालले आहेत.

साधारण सभा आयोजित न केल्यानेही सभासदांमध्ये नाराजी आहे. खालापूर तालुका शिक्षण मंडळ ही संस्था खालापूर तालुक्यात असताना ही तालुक्याच्या बाहेरील अलिबाग येथील अनेकांना सदस्य करून घेतले आहे. याबाबतही खोपोलीकरांमध्ये संस्था विरोधात नाराजी आहे आतापर्यंत केलेल्या सदस्यांमध्ये पेट्रासमध्ये ४१८ जणांची नावे तसेच फेलोजमध्ये २६३६ इतकी नावे कमी असल्याचा धक्कादायक प्रकार दस्तुरखुद्द संस्थेचे माजी अध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी संस्थेचे अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

१६ डिसेंबरच्या बैठकीचा इतिवृत्तांची मागणी ही मसूरकर यांनी केली आहे. संस्थेच्या कारभारात रोख रक्कम याची पण माहिती संस्था अध्यक्षांनी द्यावी अशी लेखी पत्रात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही संचालक बोर्डातील यशवंत साबळे व आता दत्ताजी मसुरकर यांच्या पत्रांना संस्था अध्यक्ष काय उत्तर देतात याकडे साऱ्या सभासदांचे व खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे.

संस्थेच्या अनागोंदी कारभाराबाबत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडेही तक्रार करण्यात आली होती. यावेळी त्यांनी संस्थाचालकांना कारभार सुधारा; अन्यथा शासनाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल, असे प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले होते.

## डॉ. दीपक टिळक यांचे निधन

**पुणे :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पणतू आणि 'केसरी'चे विश्वस्त संपादक डॉ. दीपक जयंत टिळक यांचे बुधवारी (दि. १६) पहाटेच्या सुमारास निधन झाले. त्यांनी पुण्यातील राहत्या घरी ७८व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. डॉ. टिळक यांनी शिक्षण, पत्रकारिता, सामाजिक कार्य या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले असून कुटुंबाच्या सामाजिक कार्याचा वारसा त्यांनी प्रामाणिकपणे पुढे नेला. त्यांच्या पश्चात पुत्र रोहित टिळक, कन्या, नातवंडे असा परिवार आहे.

## विद्यार्थ्यांचा गुणगौरव, ज्येष्ठांना छत्री वाटप

# मदत करणे हाच खरा धर्म -लोकनेते रामशेठ ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका सुशिला जगदीश घरत यांच्या वाढदिवसानिमित्त अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी गौरव आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन पनवेलमध्ये उत्साहात झाला. या वेळी त्यांनी दुसऱ्याची मदत करणे हा सर्वात मोठा धर्म आहे आणि हा धर्म सुशीला घरत आणि जगदीश घरत जपत आहेत, असे गौरवोद्गार काढले.

नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, माजी उपमहापौर चारुशीला घरत, वर्षा ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, के.डी. म्हात्रे, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, वर्षा नाईक, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, सुधाकर थवई, जगदीश घरत, प्रभाग १७चे अध्यक्ष विजय म्हात्रे, पनवेल वैद्यकीय सेलच्या अध्यक्ष डॉ. अस्मिता घरत, अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाचे अध्यक्ष

### माजी नगरसेविका सुशिला घरत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

अमेश तारेकर, उपाध्यक्ष नानचंद भोपी, संदीप पाटील, सचिव शेखर करमरकर, कार्याध्यक्ष सचिन पाटील, खजिनदार राहूल मालोतकर, सल्लागार परशुराम ठकेकर, श्रवण घोसाळकर, मयुर कदम, रतन नेपाडे, तुषार भगत, राजू बोराडे, प्रशांत आवळे, किसन गायकर, विजय म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी सुशीला घरत यांचे अभीष्टचिंतन केले.

या कार्यक्रमात नवीन पनवेल परिसरातील विविध शाळांमधील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला आणि त्यांना उपयुक्त अशा छत्र्यांचे वाटप करण्यात आले. गेल्या २२ वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबवून समाजातील ज्येष्ठांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश साधला जात आहे.

या उपक्रमाचे कौतुक करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, समाजातील ज्येष्ठ नागरिकांना सन्मान देणे ही आपल्या संस्कृतीची खरी ओळख आहे तसेच आजची तरुण पिढी शिक्षणात पुढे जावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. सुशिला घरत यांच्या पुढाकाराने गेली दोन दशके हा उपक्रम सातत्याने सुरू आहे ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात अशा सामाजिक उपक्रमांची नितांत आवश्यकता आहे. ज्येष्ठांचा सन्मान केल्याने समाजाला मूल्याधारित दिशा मिळते आणि विद्यार्थी गौरवामुळे शिक्षणात स्पर्धा व प्रगतीला चालना मिळते. त्यामुळे हा स्त्युत्य असा सामाजिक उपक्रम असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले तसेच गेली २२ वर्षे सलगपणे हा उपक्रम सुरू ठेवणे ही फार मोठी बाब आहे. समाजासाठी आपली बांधिलकी सिद्ध करणारा हा उपक्रम खरोखरच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात सुशिला घरत यांनी सर्व मान्यवरांचे, कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या नागरिकांचे, पालकांचे, विद्यार्थ्यांचे आणि ज्येष्ठ नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. त्या म्हणाल्या, गेल्या २२ वर्षांपासून हा उपक्रम अविरत सुरू ठेवता आला याचे समाधान आहे. समाजातील ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि मुलांची प्रगती हेच आमचे खरे यश आहे. अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाचे सर्व सदस्य, प्रियदर्शनी महिला मंडळाच्या अध्यक्ष व पदाधिकारी, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्यावाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन यशस्वी व्हावे असा सल्ला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यात येते. त्या अंतर्गत वहाळ, मोरावे, बामणडोंगरी आणि जावळे येथील रायगड जिल्हा परिषेदेच्या शाळांमध्ये भारतीय जनता पार्टी उलवे नोड २ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला वहाळचे तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम कोळी, वहां ग्रामपंचयतीचे माजी उपरपंच अमर म्हात्रे, उलवे नोड १ चे अध्यक्ष निलेश खारकर, युवामोर्चा अध्यक्ष धीरज ओवळेकर, माजी सरपंच गणेश पाटील, शैलेश भगत, दिपक गोंधळी, प्रवीण ठाकूर, सुहास गोंधळी, हरि घरत, नंदकुमार गोंधळी, विनायक कोळी, किरण म्हात्रे, अमित नाईक, मिन्नाथ भोईर, प्रणय कोळी, कल्पना पाटील, बाळाराम पाटील, साईनाथ साळुंखे, गणेश पाटील, विष्णू ठाकूर, गणेश बारकू पाटील, धावजी दापोलकर, भानुदास ठाकूर, रोशनी भावेश घरत, शैला गणेश पाटील, लीलावती अशोक पाटील, शैलेश भगत, सुहास गोंधळी, दीपक गोंधळी, प्रवीण ठाकूर, हारी घरत, समीर ठाकूर, भावेश घरत संदेश साळुंखे, रविकांत म्हात्रे, अमित नाईक, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## पनवेलच्या ३५ ग्रामपंचायतींमध्ये होणार महिला सरपंच, आरक्षण जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० या कालावधीतील सरपंच पदांची आरक्षण सोडत मंगळवारी १५ जुलै रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे पार पडली. यावेळी ३५ ग्रामपंचायतींवर महिलाराज येणार आहे.

अनुसूचित जातीसाठी– नेरे, करंजाडे, अनुसूचित जातीसाठी (महिला)– सावळे, अनुसूचित जमातीसाठी –आपटा, पोसरी, मालडुंगे, कर्नाळा, गव्हाण, अनुसूचित जमाती (महिला)– खैरवाडी, नानोशी, बारवई, शिरवली, कानपोली, वाजे, नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी– कोन, शिवकर, चावणे, नितळस, हरिग्राम, वांगणी तर्फे वाजे, तूराडे, चिंध्रण, वडघर, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) –खानावळे, वाघिवली, आकुर्ली, दापोली, वाकडी, सांगुर्ली, ओवळे, देवळोली, आदई, पोयंजे, सर्वसाधारणसाठी– दिघाटी, विचुंबे, शिरढोण, गिरवले, खानाव, मोरबे, वलप, देवद, चिपळे, पळस्पे, कोळखे, कसळखंड, साई, नांदगाव, कुंडेवहाळ, कराडे खुर्द, केळवणे, वहाळ, वावंजे, गुळसुंदे, सर्वसाधारणसाठी (महिला) –पाली देवद, चिखले, पारगाव, उलवा, तरघर, खेरणे, केवाळे, पाले बुद्रुक, वावेघर, भाताण, जांभिवली, वारदोली, उमरोली, भिंगार, सोमटणे, न्हावे, दुंदरे, उसर्ली खुर्द या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## उरणमधील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण मंगळवारी १५ जुलै रोजी सोडत पद्धतीने काढण्यात आले. उरणचे तहसिलदार डॉ.उद्धव कदम यांच्या अधिपत्त्याखाली काढण्यात आलेल्या या सोडतीत तालुक्यातील ३५ पैकी १७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदावर महिलांना संधी प्राप्त होणार आहे.

महिला आरक्षणामध्ये उरण तालुक्यातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या चाणजे ग्रामपंचायत आणि चिर्ले ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी अनुसूचित जमाती व रानसई ग्रामपंचायतीचे सरपंच पदी अनुसूचित जमाती महिला राखीव आरक्षण पडले आहे.तर चिरनेर,नवघर,बांधपाडा,पागोटे,पाणजे,

धुतुम,विंधणे,फुंडे,सारडे,पुनाडे,गोवठणे या ११ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच सर्वसाधारण महिलांना सरपंच होता येणार आहे.

केगाव,पिरकोन,बोकडविरा,मोठीजुई व कळंबूसरे या ग्रामपंचायतींमध्ये नामाप्र महिला सरपंच पदाचे आरक्षण लागू झाले आहे.कोप्रोली,भेंडखळ.



**पनवेल : येथील नवनियुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची बुधवारी सदिच्छा भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन भाऊसाहेब ढोले यांचे अभिनंदन केले व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी उमेश इनामदार उपस्थित होते.**

## गाडीचा टायर फुटून अपघात; पाच जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबई लेनवर कि.मी.४/४०० येथे खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गाडीचा टायर फुटून गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी पलटी होऊन झालेल्या अपघातात गाडीतील पाच जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

चालक बजरंग सणवारलाल शर्मा (वय २७) हे रेनाल्ड कंपनीची क्विड कार चालवत असताना कारचा पुढील टायर फुटल्याने गाडी वरील नियंत्रण सुटल्याने गाडी पहिल्यां लेनला पलटी झाली. अपघातामध्ये गाडीतील ममता बजरंग शर्मा वय २६ वर्ष, कमलादेवी सणवरलाल शर्मा वय ६५ वर्ष शांती सनवरलाल शर्मा वय ४५ वर्ष राहणार कळंबोली माही बजरंग शर्मा वय ३ वर्ष, अंशुमन बजरंग शर्मा वय ६ महिने हे जखमी झाले आहेत.








## संपादकीय

# वेळीच सुसज्ज्ञता हवी

पावसाने सोमवार, मंगळवारी कोकणपट्टीला अक्षरश: झोडपून काढल्याने रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजीवनाला फटका बसला. रायगड जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर आला तर मुंबई-गोवा महामार्गाची नागोठण्याजवळ नदी झाल्याचे चित्रही समोर आले. बुधवारी पावसाने विश्रांती घेतल्याने नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी कशेडी घाट व बोगद्यातील वरचेवर दरड कोसळण्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज दिसते आहे.

**अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने संपूर्ण कोकण किनारपट्टीसह घाटमाथ्यावर मंगळवारी पावसाने जोरदार हजेरी लावली. रायगड जिल्ह्यात तुफान पाऊस कोसळला. महाड तालुक्यात सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. महाड शहराला पाण्याने वेढा घातला. २०२१ मध्ये सावित्री नदीने धारण केलेले रौद्ररूप महाडच्या नागरिकांच्या अद्यापही स्मरणात आहे. त्यावेळी अनेक संसार उद्ध्वस्त झाले होते. यंदा खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने वेळीच नदीकाठच्या नागरिकांना स्थलांतराच्या सूचना दिल्या होत्या. किल्ले रायगडावर जाणारा पायरी मार्गही नागरिक व पर्यटकांसाठी १५ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. रायगडमधील आंबा, कुंडलिका या नद्यांनीही धोक्याची पातळी ओलांडल्याने संपूर्ण जिल्ह्याला मंगळवारी रेड अलर्ट देण्यात आला. आंबा नदीची पाणीपातळी वाढून नागोठणे शहरात पाणी शिरले तर कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने रोहे शहर, कोलाड नाक्यावरही दुकानांमध्ये पाणी शिरले. मुंबई-गोवा महामार्गावर खेड तालुक्यातील कशेडी घाटात दरड कोसळून काही तास होण्याआधीच, घाटाला पर्याय असलेल्या बोगद्याजवळही मंगळवारी पहाटे आणि दुपारी अशी दोनदा दरड कोसळली. यंदाच्या पावसात तिसऱ्यांदा असे घडले आहे. मे व जून महिन्यातही याच ठिकाणी दरड कोसळून वाहतुकीला अडथळा झाला होता. मंगळवारी दरड कोसळल्याने मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक एकाच लेनवरून सुरू ठेवण्यात आली. वारंवार दरड कोसळत असल्यामुळे येथे बोगद्याच्या दोन्ही बाजूला पथक सज्ज ठेवणे गरजेचे बनले आहे. तसेच वेळोवेळी खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळेही अपघाताची शक्यता दिसते. मोठी दुर्घटना टाळण्यासाठी या परिसरात तातडीने खबरदारीची उपाययोजना करण्याची गरज आहे. पोलादपूर तालुक्यातील भोगाव येथील घाटरस्त्यावर दरड कोसळल्याने कशेडी बोगद्याला पर्यायी असणारा मार्गही बंद झाल्याने वाहनचालकांची प्रचंड गैरसोय होते आहे. जिल्हा प्रशासन, पोलिस आणि महामार्ग प्राधिकरण या सर्वच यंत्रणा सतर्क असून नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय या मार्गाचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बुधवारी रायगड जिल्ह्यात फारसा पाऊस झाला नाही, त्यामुळे नागरिकांना काहिसा दिलासा मिळाला. परंतु दोन दिवसांच्या मुसळधार पावसांत उद्भवणारी पूरस्थिती चिंता वाढवणारी आहे. मंगळवारी रत्नागिरीतही जगबुडी, कोदवली, शास्त्री या नद्या दुथडी भरून वाहू लागल्याने अनेक भाग जलमय झाले. मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वर येथे डोंगराचा भाग महामार्गावर वारंवार येत असल्याने वाहनांना अडथळा पार करत सिंधुदुर्गकडे जाण्याची कसरत करावी लागते आहे. संगमेश्वर बाजारपेठेतही काही दुकानांमध्ये पाणी शिरले. सिंधुदुर्ग जिल्ह्यालाही पावसाचा फटका बसला. अर्थात पावसामुळे जनजीवन विस्कळीत होत असले व काही प्रमाणात नुकसानीचा फटका बसत असला तरी पावसाकडूनच आपल्या जगण्याला नवसंजीवनीही मिळते. पाऊस नीट होऊन शेतशिवारे फुलल्यावर व धरणे भरल्यावरच आपल्याला हायसे वाटते. आताच्या घडीला रायगड लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या जिल्ह्यातील २८ पैकी २२ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा आहे हे दिलासादायकच म्हणायला हवे.**

# उद्योजकांना उद्योजकांकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाच्या कर्ज योजना

कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. काय आहे ही योजना जाणून घेऊया लेखातून...

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या) व दोन उपकंपने राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै.मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ या महामंडळाची स्थापना केली आहे.

समाजातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु. १.०० लक्षाची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व २५ टक्के बीज भांडवल योजना या योजना ऑफलाईन अर्ज आहे तसेच वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना योजना (रु. १५ लाख) व गट कर्ज व्याज परतावा (रु. १० लाख) आहे.

रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना : लाभार्थींना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी ४ वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता रु. २०८५.

२५ टक्के बीज भांडवल योजना :- कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५ लक्ष पर्यंत. कर्ज परत फेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५० वर्ष आहे. बँकेमार्फत लाभार्थींना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग २५ टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या रक्कमेवर व्याजाचा दर ४ टक्के असतो.

या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :- पासपोर्ट साईज २ फोटो, तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधापत्रिकेची झेरॉक्स, स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला, भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ. कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना या योजनांकरीता महामंडळाच्या www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १५ लक्ष पर्यंत) :- ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु. १५लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्ष आहे. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, महामंडळाच्या www.vjnt.org, या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जातात.

गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लक्ष ते ५० लक्षपर्यंत) :- विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गतील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाते.

या योजनेमध्ये बँकेने रु. १० लक्ष ते रु. ५० लक्ष पर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूरी केलेल्या अर्जदाराने कर्जाचे मासिक हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम ( १२ टक्के मर्यादेत) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. (जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या किंवा रु.१५.०० लाखाच्या मर्यादेत) कर्ज परत फेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ४५ वर्षे आहे. अर्जदारांने अर्ज करण्यासाठी सर्व सभासद हे विजाभज व वि.म.प्रवर्गातील असावी. महामंडळाच्या www.vjnt.org या वेबपोर्टलद्रवारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जातात.

या योजनांसाठी लगणारी सर्वसाधारण कागदपत्रे पासपोर्ट साईज फोटो, तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मुळ दाखला, (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लाख), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचा दाखला (विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक (कोटेशन), आधारकार्ड, पॅनकार्ड, शिधापत्रिका, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या बँक पासबुक, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे दाखला/जन्मतारखेचा दाखला, व्यवसायचे कोटेशन.

इच्छुक, गरजु विजाभज व वि. म.प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय: श्री राम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या., सदनिका क्र. १, तळमजला, मारुती मंदिरामागे, चेंढरे अलिबाग, जि.रायगड, दूरध्वनी ०२१४१-२२१३०७, Email vnvintdcraigad3gmail.com येथे संपर्क साधावा तसेच अधिक माहितीसाठी www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक पोपट गिते यांनी कळविले आहे. **-रायगड जिल्हा माहिती कार्यालय**

# रामदास फेरीबोट दुर्घटना : एक शोकांतिका

१७ जुलै १९४७ रोजी घडलेली रामदास फेरीबोट दुर्घटना ही महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सागरी इतिहासातील एक अत्यंत दु:खद आणि भीषण घटना ठरली. मुंबईहून अलिबागकडे निघालेली ही फेरीबोट समुद्रात बुडून सुमारे ५०० हून अधिक निरपराध प्रवाशांचा मृत्यू झाला.

ही बोट मुंबईच्या मझगाव डॉक येथून सकाळी निघाली होती. त्यामध्ये सुमारे ७०० प्रवासी होते. बोट कुलाबा रेखाजवळ आल्यानंतर अचानक वादळ उठले, जोरदार वारे आणि उंच लाटा आल्याने बोटीचा तोल गेला आणि ती उलटली. बोट उलटल्यावर लोकांना सावरण्याची संधीच मिळाली नाही.

त्या काळी बोटीमध्ये आजच्या प्रमाणे सुरक्षाविषयक सुविधा नव्हत्या. लाइफ जॅकेट्स, रेडिओ सिग्नलिंग सिस्टिम, तातडीच्या मदतीसाठी आपत्कालीन बोट्स अशा कोणत्याही सुविधा नव्हत्या. त्यामुळे जीवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली. काही लोकांनी पोहत स्वतःचा जीव वाचवला, तर काहींना स्थानिक मच्छीमारांनी मदत केली.

या दुर्घटनेनंतर संपूर्ण कोकण आणि मुंबई परिसरात शोककळा पसरली. अनेक घरांमधून एकापेक्षा अधिक सदस्य गेले. काही कुटुंबे अक्षरशः उद्ध्वस्त झाली.



## बदलते तंत्रज्ञान

# भारतीय कंपनीने सादर केले एआय स्मार्ट ग्लास

इंडियन डीप-टेक स्टार्टअप Question What's Real (QWR)ने एक नवीन आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) पावर्ड स्मार्ट ग्लासेस लाँच केले आहेत. हे स्मार्ट ग्लासेस Humbl या नावाने लाँच केले आहेत. स्टार्टअप कंपनीने असा दावा केला आहे की, Humbl भारताचे पहिले AI स्मार्ट ग्लासेस आहेत. या डिव्हाईसमध्ये Ray-Ban Meta AI ग्लासेस सारखे डिझाईन आणि फीचर्स देण्यात आले आहेत. यामध्ये AI असिस्टेंट आहे, जो व्हिडीओ रिकॉर्ड करू शकतो, याशिवाय कन्वर्सेशनची समरीदेखील देऊ शकतो.



एक प्रेस रिलीजमध्ये, डीप-टेक स्टार्टअपने त्यांचे लेटेस्ट प्रोडक्ट सादर केले आहे आणि सांगितलं आहे की, Humblचा फोकस यूटिलिटी, डिस्क्रिशन आणि कंटेक्सचुअल अवेयरनेसवर आहे. कंपनीने या नवीन डिव्हाईसबाबत जास्त माहिती शेअर केली नाही, मात्र या नवीन डिव्हईसच्या फीचर्स आणि लूकचा विचार केला तर हे डिव्हाईस Ray-Ban Metaसारखेच आहे.

Humblचा वापर एका सामान्य सनग्लासेसप्रमाणे देखील केला जाऊ शकतो, मात्र जेव्हा यामध्ये असणाऱ्या AI असिस्टेंट "Hey Humbl' वेक फ्रेज ॲक्टिव्हेट केले जाते, तेव्हा हे डिव्हाईस एक असामान्य ग्लासेस बनते. AI असिस्टेंट "Hey Humbl' वेक फ्रेज ॲक्टिव्हेट झाल्यानंतर व्हॉईस कमांड्सद्वारे पॉइंट-ऑफ-व्यू वीडियोज रेकॉर्ड करू शकते. हे मीटिंग्स आणि संभाषणांचा सारांश देऊ शकते, रिमाइंडर्स सेट करू शकते, एखाद्या ठिकाणाचे डायरेक्शन्स देऊ शकते आणि पूर्णपणे हँड्सफ्री आणि व्हॉइस इनपुटसह म्यूझिक प्ले करू शकते. याशिवाय, एआय असिस्टंट रिअल-टाइम ट्रांसलेशन्स देखील प्रदान करू शकतो. कंपनीने हाइलाइट केला आहे की, स्मार्ट ग्लासेसचा AI असिस्टेंट ऑडियो आणि व्हिडीओ चॅनल्सकडून डेटा कलेक्ट आणि प्रोसेस करू शकतात. डिव्हाईसमध्ये कॅमरे आहेत, जे त्याला विजुअल फीड प्रदान करतात, ज्यामुळे ते आइटम्स आणि लँडमार्क्स ओळखू शकते आणि यूजरला त्यांच्या गंतव्यस्थानावर मार्गदर्शन करण्यासाठी वळणे सुचवते.

# आज आंतरराष्ट्रीय न्याय दिन

मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करून अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे हा त्याचा उद्देश आहे.

यामागचे कारण असे की, २०१० रोजी कंपाला (युगांडा)मध्ये झालेल्या रूम विधान कायद्याचा आढावा परिषदेत राज्य पक्षांच्या असेंब्लीने १७ जुलै हा आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाचा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय न्यायाची मजबुतीकरण यंत्रणा ओळखण्यासाठी तसेच पीडितांच्या हक्कांना न्याय देण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायासाठी जागतिक न्याय दिन दरवर्षी १७ जुलैला साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय न्यायासाठी जागतिक दिन हा रोम विधानचा ऐतिहासिक वापर आणि १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाची नवीन यंत्रणा स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

आधुनिक समाजात सर्व लोकांना समान संधी आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा केवळ सामाजिक न्यायाचा नाही तर सर्व देशांचा आदर्श आहे. सर्व लोकांच्या सामाजिक भूमिका पूर्ण व्हाव्यात आणि लोकांचे हक्क त्यांना दिले जावे. यासाठी समाजातील विविध संस्थांना अधिकार आणि कर्तव्ये दिली जातात, ज्यामुळे ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, हेच सामाजिक न्यायाचे ध्येय आहे.



**निमित्त**

आंतरराष्ट्रीय न्याय दिन हा रोम विधानचा ऐतिहासिक वापर आणि १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाची नवीन यंत्रणा स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. १७ जुलै १९९८ रोजी १२० देशांनी एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाचा रोम कायदा नावाच्या करारावर स्वाक्षरी केली. आणि १ जुलै २००२ रोजी हा कायदा लागू करण्यात आला. तेव्हापासून हा दिन साजरा केला जातो. एकूण देशांपैकी १२० देश या कराराच्या बाजूने होते. तर, २१ देश या कायद्याच्या विरोधात होते. यामध्ये चीन, इस्रायल, अमेरिका आणि इराक या देशांचा सहभाग होता.

जागतिक न्याय दिनाचे उद्दिष्ट आयसीसीच्या (ICC) प्रयत्नांचे कौतुक करणे आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांना बळी पडलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांना एकत्र करणे हा आहे. खउउ ने प्रामुख्याने मानवतेविरुद्धचे गुन्हे (संहार, खून इ.), नरसंहार (जाणूनबुजून एका समुदायाला हानी पोहोचवणे), युद्ध गुन्हे (इच्छुकपणे दु:ख, छळ इ.) आणि आक्रमकतेचे गुन्हे (लष्करी व्यवसाय, संलग्नीकरण इ.) यावर लक्ष केंद्रित केले. हा दिवस अनेक संस्थांद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला जातो, तर या दिवशी युद्ध गुन्हेगारी पीडितांना श्रद्धांजली वाहून त्यांचे स्मरण केले जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालय हे संयुक्त राष्ट्रसंघाचे एक अंग आहे. नेदरलँड्समधील हेग या शहरात हे न्यायालय स्थित आहे.

**-साभार इंटरनेट**

## बातमीतील बात






## आरोग्य प्रहर

# जास्त झोपल्यावर शरीराचे गंभीर नुकसान

चांगल्या आरोग्यासाठी योग्य झोप खूप महत्वाची आहे हे आपल्या सर्वांना माहित आहे, झोपेशी संबंधित समस्या सहसा दोन प्रकारच्या असतात. पहिलं म्हणजे पूर्ण झोप न येणं आणि दुसरं म्हणजे जास्त झोप घेणं. या दोन्ही गोष्टी धोकादायक आहेत कारण यामुळे आपल्या शरीराचे गंभीर नुकसान होऊ शकते. कमी झोपणे आणि जास्त झोपणे दोन्ही हानिकारक आहे आणि त्याचा काय परिणाम होऊ शकतो हे जाणून घेऊया.



**आपण एका दिवसात किती झोप घ्यावी?**

जगभरात झालेल्या संशोधनानुसार निरोगी प्रौढ व्यक्तीने रात्रभर किमान ७ ते ८ तास झोप घेतली पाहिजे, तरच त्यांच्या शरीराची कार्ये व्यवस्थित काम करतील आणि समस्या उद्भवणार नाहीत.

जर तुम्हाला रात्रीच्या वेळेत नीट झोप येत नसेल तर त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशी स्पष्टपणे दिसून येतो. यामुळे थकवा, सुस्ती, शरीर बिघडणे, ऊर्जेची कमतरता होऊ शकते. कमी झोपेमुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका असू शकतो, असा दावाही अनेक आरोग्य तज्ज्ञ करतात.

आपल्या झोपेची वेळ निश्चित करा आणि वेळ, शेड्युल बदलण्याचा प्रयत्न करू नका. जास्त झोप घेतली किंवा आळशीपणामुळे शरीराचे अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते.

**नार्कोलेप्सी**

हा एक विचित्र झोपेचा विकार आहे ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला दिवसा जास्त झोप येऊ लागते किंवा अचानक झोप येते. प्रवास करताना हा आजार धोकादायक ठरतो.

**स्लीप एपनियाचा**

यात श्वासोच्छवासावर वाईट परिणाम होतो आणि नियमित श्वासोच्छ्वास थांबतो. त्यामुळे आवश्यक तेवढी झोप घ्यावी.

**इडिओपॅथिक हायपर सोम्निया**

जे लोक इडिओपॅथिक हायपरसोम्नियाने त्रस्त असतात त्यांना दैनंदिन जीवनातील सामान्य क्रिया करताना खूप थकवा जाणवतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# विजेची तार तुटल्याने चौक बाजारात खळबळ, सुदैवाने जीवितहानी टळली

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेत गिऱ्हाईक यांची सकाळी वर्दळ वाढत असताना अचानक विद्युत पुरवठा करणारी वाहिनी अचानक तुटल्याने घबराट झाली,सुदैवाने एवढी वर्दळ असताना जीवितहानी अगर कुणीही जखमी झाले नाही.

सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास चौक दूर क्षेत्र पोलीस ठाण्याच्या पुढील बाजूस ते जय हिंद स्टोअर्स पर्यंतची वीज पुरवठा करणारी वाहिनी तुटल्याने व्यापारी,गिऱ्हाईक आणि नागरिक यांच्यात घबराट निर्माण झाली, सुमारे तीनशे फूट वाहिनी तुटल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. स्थानिक कार्यकर्ते यांनी बाजार पेठ मध्ये आलेल्या गिऱ्हाईक, नागरिक यांना सावध केले आणि वीज पुरवठा कर्मचारी यांना पाचारण केल्यावर तेथील वीज पुरवठा खंडित करण्यात आला आणि पुढील अनर्थ टळला.

सद्या वादळ वारा, जोरदार पाऊस याने वीज वाहिनी तुटणे, पोल वाकणे असे प्रकार घडत आहेत, अनेक वर्षे देखभाल दुरुस्ती, जीर्ण वाहिनी, विद्युत खांब यांची नव्याने उभारणी करण्यात यावी, यासाठी आपण वीज पुरवठा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली असून तसा प्रस्ताव ग्राम पंचायत चौक यांच्या कडून पाठवण्यात येईल, असे सरपंच रितू ठोंबरे यांनी सांगितले.



## नमुना एन. डी.

(नियम ९२ (अ) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46 CF 9559 चे मालक **गिता पप्पू यादव** हीचे तारीख ८/१/२०२५ रोजी निधन झाले.

मी पप्पू शंभू यादव, पत्ता– C/O राम परशे, शाळेसमोर, परशे चाळ, कळंबोळी रायगड, महाराष्ट्र –४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव –पप्पू शंभू यादव**
**पत्ता– c/o राम परशे, शाळेसमोर, परशे चाळ, कळंबोळी रायगड, महाराष्ट्र –४१०२१८**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भिंगार, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार शारदा प्रकाश सिध्दे, रवि अनंत कोळी, महेश अनंत कोळी, विजया पांडुरंग कोळी, वैशाली विलास कोळी, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे भिंगार, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| १५० | १ | ०–०७–०० | ०–००–०० | ०–०७–०० | ०.५३ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजण्यात येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/०७/२०२५**

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

**कार्यालयीन पत्ता**
**ऑफीस नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

# रस्त्यांच्या दुर्दशेमुळे ई–रिक्षाचालकांची तारेवरची कसरत; प्रशासन हतबल



**माथेरान : बातमीदार**

माथेरानच्या पर्यटन वाढीच्या दृष्टीने जरी याठिकाणी येण्यासाठी नेरळ मार्गे माथेरान याच मार्गाशिवाय अन्य पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसताना देखील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी पासून गावात येण्यासाठी अल्प प्रमाणात असलेल्या ई–रिक्षांमुळेच इथे पावसाळ्यात कधी नव्हे एवढी पर्यटकांची गर्दी पहावयास मिळत आहे. याच दोन वर्षात इथे वर्षाऋतु मध्ये पर्यटकांची नियमितपणे एक प्रकारची जत्रा भरलेली दिसते.वेळप्रसंगी राहायला खोल्या सुध्दा उपलब्ध होत नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात पर्यटक विशेष करून शनिवार आणि रविवार यादिवशी केवळ ई–रिक्षा सुरू झाल्यापासूनच गर्दी करताना दिसत आहेत.यामुळेच सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

एकूण फक्त वीस ई –रिक्षा सर्वांच्या सेवेस तत्पर असतात परंतु पंधरा रिक्षा शालेय विद्यार्थ्यांना नियमितपणे ने आण करत असून पाच रिक्षा पर्यटक, नागरिक, रुग्णांची सेवा करण्यास सज्ज असतात. त्यातच येथील रस्त्यांची अवस्था खूपच दयनीय बनलेली असल्याने चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.खराब रस्त्यांमुळे सतत ई–रिक्षांना दुरुस्तीसाठी नेरळ अथवा पनवेल याठिकाणी घेऊन जाव्या लागत आहेत.त्यामुळे प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागते. त्यासाठी इथे ई–रिक्षांची संख्या वाढल्याशिवाय सर्वांना वेळेवर सुरळीतपणे सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही.

दस्तुरी जवळील काळोखी ह्या तीव्र चढावाच्या भागात रस्ता खूपच खडतर बनलेला असून अधिकारी वर्ग नियमित याच ई रिक्षातून प्रवास करतात त्यांनी प्रामुख्याने ह्या खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करून घेणे गरजेचे आहे. रिक्षा, पर्यटक,घोडे आणि पादचाऱ्यांची याच अरुंद रस्त्यावरून सातत्याने रहदारी सुरू असते.लवकरच हा रस्ता चांगल्या पद्धतीने बनविला नाही तर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे माजीनगरसेवक संतोष लखन यांनी म्हटले आहे

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

### जाहिर निविदा पत्रक

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनिवासी नळजोडण्यावर पोस्टपेड जलमापक बसविणेबाबत या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरता खाली नमूद केलेल्या बाबीकरता खालील नमुन्यात दर मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनिवासी नळजोडण्यावर पोस्टपेड जलमापक बसविणेबाबत | १७/०७/२०२५ ते २३/०७/२०२५ (७ दिवस) |

### Specification

| Sr. No. | Description | Unit | Qty |
|---|---|---|---|
| 1 | **Item No. 1 Post Paid Water Meter** | | |
| | Providing, insatiling and giving satisfactory field testing of domesting battery operated Ultrasonic/Electro magnatic Post paid Water meter with no measuremant of air along with manufacturing test certified and guarantee certificate with battery life of minimum 10 years with GSM/GPRS/RF/LORA technology for communication to server with PC software including 36 months guarantee, etc. | | |
| | **General Specifications:-** 1. meter should be battery operated with no moving parts, low pressure loss, dry type as per ISO 4064/ OIML R49 and certification as per FCRI/MID 2. Display: 9 digits LCD 3. Enclosure: protection class IP 68 4. Temperature Ambient 50 deg. C 5. Pressure: PN 1.6 6. power Supply: 3.6 v lithium battery with minimum life of 10 years 7. Memory built-in and should have storage for atleast 12 months with daily/ monthly accumulated totalised data with time and date should be availabl. It should be able to acess memory of the meter through serial communication 8. End Connections: Screwd upto 40 mm 9. Installation: should be able to install in any orientation 10. Locations: Indoor/Outdoor Ultrasonic/Electrmagnatic Post paid Water Meter | | |
| | 15 mm dia | NO. | 1 |
| | 20 mm dia | NO. | 1 |
| | 25 mm dia | NO. | 1 |
| | 40 mm dia | NO. | 1 |
| | 50 mm dia | NO. | 1 |
| | 80 mm dia | NO. | 1 |
| | 100 mm dia | NO. | 1 |
| 2 | **Item No. 2 Server Software** | NO. | 1 |
| | Providing, Installing, Testing and Commissioning of Laptop or Computer station with programming software (web based) run time version along with required cables | | |
| 3 | **Item No.3 Gateways** | NO. | 1 |
| | Providing supplying, installing and giving satisfactory field test of GPRS gateway for aggregation of field data at Command | | |
| 4 | **Item No.4 Credit Loading Unit** | NO. | 1 |
| | Providing supplying and giving satisfactory field test of Loading Unit | | |
| 5 | **Item No.5** | NO. | 1 |
| | Providing, installing and give satsfactory trail of software android for app mobile. | | |
| 6 | **Item No. 6** | NO. | 1 |
| | Providing smart prepaid card for consumer and authoris | | |
| 7 | **Item No. 7 Meter Box** | NO. | 1 |
| | Providing, installing and give satisfactory trial of water meter box with locking arrangement to protect the water meter | | |
| 8 | **Item No. 8 End Connectors** | | |
| | Providing, supplying and insatiling the end connectors of the water meters. | | |
| | 15 mm dia | NO. | 1 |
| | 20 mm dia | NO. | 1 |
| | 25 mm dia | NO. | 1 |
| | 40 mm dia | NO. | 1 |
| | 50 mm dia | NO. | 1 |
| | 80 mm dia | NO. | 1 |
| | 100 mm dia | NO. | 1 |

वर नमूद सूचित दर्शविलेल्या बाबीचे पुरवठा करणारे पुरवठादार/उत्पादक/विक्रेते यांनी नमूद केले बाबीकरता असलेले दर स्वतःच्या लेटरहेडवर महापालिकेच्या कार्यालयात अथवा ई–मेल द्वारे panipurvthaoffice@gamil.com यावर दिनांक २३/०७/ २०२५ पर्यंत पाठवावे हि विनंती, सदर दर हे अंदाजपत्रक तयार करणेसाठी गृहीत धरण्यात येणार आहेत.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३२५/३३८/२०२५**
**दिनांक :– १६/०७/२०२५**

**सही/–**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत माझे अशिलांने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन **१. श्री. लक्ष्मण तुळशीराम पाटील २. श्री. हरिभाऊ तुळशीराम पाटील ३. सरस्वती तुळशिराम पाटील ४. श्री. प्रभाकर तुळशीराम पाटील ५. श्री. सदानंद तुळशीराम पाटील ६. श्री. अविनाश तुळशीराम पाटील ७. सुवर्णा सुदाम घरत** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णीत जमीन मिळकत ही त्यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीत व तावे कब्जात आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कैरे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| कैरे | १४३/२/ब | ०–४२–०० पो.ख. ०–०३–०० एकूण ०–४५–०० | ८.७८ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेपट्टाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/०७/२०२५**

**सही/–**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता : डी/३/१, किनारा हौ. सोसायटी, बावन बंगलो पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६**
**मो. नं. ९८२०७९५६०५**

# वडवळ टोलनाक्याजवळ अपघातात मोटरसायकलस्वार ठार



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली–पेण मार्गावरील खालापूरातील वडवळ टोल नाक्याजवळ स्कुटरचालकाचे नियंत्रण सुटल्याने समोर जाणाऱ्या अज्ञात वाहनाला धडक दिली या घटनेत दिनेश पोटी (५५) र.ा पोखरकर रोड १ ठाणे हे जागीच ठार झाले. शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले. ही घटना सायं ४ वा सुमारास घडली.

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel

**Plot No. 4, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Dist. Raigad 410206**

**Accredited 'B+' Grade by NAAC (1st Cycle CGPA 2.69)**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2025-2026**

**UN-AIDED**

| Sr. No. | Cadre | Subject | Total No.of Posts | Post Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | Law | 10 | 02-SC, 01-ST, 01-DT(A), 01-NT (B), 01-OBC, 01-SEBC, 01-EWS, 02 - OPEN. |

candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the. UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolutions & Circulars are available on the website mu.ac.in

Applicants who are already employed must send their applications through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Applications with full details should reach to the CHAIRMAN, J.B.S.P. Sanstha's Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel, Plot No. 4, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Dist. Raigad 410206. Candidates may submit the applications by email to **bcthakurcollegeoflaw@gmail.com,** within 20 days from the date of publication of this advertisement.

If required, contact - **Mrs. Pallavi Khot - 9820483404**
**Mr. Ujjwal Patil - 9004401961**

This is University approved advertisement.

**Shri Ramsheth Thakur (Ex.MP)**
**CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA, PANVEL**

# सुट्टीच्या आदेशात पाली तालुका उल्लेख

## जिल्हा प्रशासनाला सुधागड तालुक्याचा विसर

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीला सुरुवात झाल्यावरती जिल्हा प्रशासन अतिशय तातडीने खबरदारी घेत नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आवाहन करते. त्याच बरोबर ज्या ठिकाणी अतिवृष्टी आहे, तेथील शाळा व महाविद्यालयांना सुट्टीचा आदेशदेखील काढला जातो. मात्र या आदेशामध्ये नेहमी सुधागड तालुक्याऐवजी पाली तालुका असा उल्लेख आढळून येत आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मंगळवारी (ता.१५) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अतिवृष्टी असल्याने माणगाव, महाड, रोहा, पोलादपूर, तळा व पाली तालुक्यातील शाळा व महाविद्यालय यांना सुट्टी देण्याचे आदेश काढण्यात आले. तसेच जून महिन्यामध्ये १९ तारखेला सुट्टीचा आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काढण्यात आला आणि त्यावेळी देखील सुधागड तालुक्याऐवजी पाली तालुका असा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम होतो. तसेच अनेकांना वाटते की पाली हा तालुका आहे, मात्र पाली हा तालुका नसून पाली हे सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण व अष्टविनायक तीर्थक्षेत्र आहे. परिणामी नागरिकांच्या अस्मितेलादेखील थोडा धक्का पोहोचतो. याबाबत समाज माध्यमांवरदेखील नागरिक आपली भावना व मते मांडत आहेत.

**स्थानिक प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकृत पत्रव्यवहार करून पाली तालुका नसून सुधागड हा तालुका आहे, हे कळविण्यात यायला हवे. नाहीतर काही वर्षांनी सुधागडचे नाव पुसून टाकतील.**
**–निलेश शिर्के, सामाजिक कार्यकर्ते**

# उरण तालुक्यात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ

## खासगी रुग्णालयात उपचार



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ग्रामिण आणि शहरी भागात अनेक गावात बदलत्या वातावरणामुळे डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. यातील अनेक रुग्ण हे खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. उरणमध्ये डेंग्यू आणि व्हायरल तापाची साथ असल्याची माहिती उरणच्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारली होती. त्यामुळे ऊन पावसाचा सामना नागरिकांना करावा लागत होता. त्यातच साचणारे पाणी आणि मोठ्या प्रमाणात असलेले कचऱ्याचे ढीग पडत्या पावसात कुजून त्यांची दुर्गंधी यातून निर्माण होणारे डास याचा परिणाम तापाच्या साथीत झाले आहे.अस्वच्छता वाढू लागल्याने व वातावरणाच्या बदलाने तापाचे रुग्ण वाढत आहेत.

उरण तालुक्यात कोप्रोली येथे एक प्रार्थमिक आरोग्य केंद्र व दुसरे उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामिण रुग्णालय एकूण दोन शासकीय रुग्णालय आहेत. या रुग्णालयात उपचार न घेता बहुतांशी रुग्ण हे खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. या रुग्णांची माहीती काही रुग्णालये शासनाला देतात, मात्र बहुतांशी रुग्णालये ही माहिती देत नसल्याचे तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**“नागरिकांना पाण्याची भांडी कोरडी करण्याच्या, स्वच्छता राखण्याच्या तसेच सार्वजनिक गटारांची साफसफाई व फॉगिंग करण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या असून या संदर्भात एक बैठकही घेण्यात आली आहे.**
**डॉ. राजेंद्र ईटकरे,**
**उरण तालुका आरोग्य अधिकारी**

# विकसकाकडे दोन कोटींच्या खंडणीची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीतील एका विकसकाला दोन करोड रुपयांची मागणी करत, पैसे नाही दिले तर विकासाची आई, भाऊ, पत्नी, तसेच मुलाला गोळी मारण्याची धमकी दिली आहे. एका अनोळखी नंबर वरून व्हाट्सअप व्हॉइस कॉल, तसेच मेसेजद्वारे धमकी दिल्याने, विकासकाने वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

इतिहासजमा झालेले नवी मुंबईतील विकसकावरील अथवा त्यांच्या परिवारातील हल्ले आता पुन्हा होण्याची भीती सुरू झाली आहे. सुरजीत भोजसिंह आयसिंघानी या विकसकाला एका अनोळखी नंबर वरून, दोन करोड रुपयांची मागणी केली आहे. जर दोन करोड रुपये दिले नाहीत तर विकसकाची आई, भाऊ, पत्नी, तसेच त्याच्या मुलाला गोळी मारण्याची धमकी दिली आहे.

व्हॉट्सॲप व्हॉइस कॉल तसेच मेसेजवर धमकी दिल्याची तसेच पैसे मागितल्याची घटना घडली आहे. नवी मुंबईतील विकसकावरील हल्ले हे इतिहासजमा झाले आहेत, मात्र आता या धमकीमुळे इतिहासाची पुनरावृत्ती होण्याच्या भीतीने, नवी मुंबईतील विकसकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# वाशीत दुचाकीस्वाराची सोनसाखळी लुटली

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीत राहणाऱ्या नीलेश पाटील (३५) यांची २ लाख १५ हजारांची सोनसाखळी चोरण्यात आली आहे. सोमवारी रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास ते दुचाकीवरून घरी चालले होते. यावेळी पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी मागे बसलेल्याने त्यांच्या मानेवर जोरात चापट मारली. यामुळे त्यांचे लक्ष विचलित होताच दुसऱ्याने त्यांच्या गळ्यातली चेन खेचून पळ काढला. चोरट्यांच्या या कृत्यामुळे त्यांचा तोल जाऊन दुचाकीच्या अपघाताचीदेखील शक्यता निर्माण झाली होती. या घटनेनंतर तक्रारीवरून वाशी पोलिस ठाण्यात अज्ञात दोघा चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

# स्वच्छताकर्मींना इनॉर्बिटच्या सीएसआर निधीतून रेनकोट वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

‘स्वच्छ आणि सुंदर नवी मुंबईसाठी आपली एकजूट’ असा संदेश देत के रहेजा समुह संचालित इनॉर्बिट मॉलच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून यशलोक वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या सहकार्याने स्वच्छताकर्मींना पावसाळी रेनकोट वितरणाचा कार्यक्रम महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात उत्साहात संपन्न झाला.



याप्रसंगी सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, आपत्ती व्यवस्थापन उपआयुक्त ललिता बाबर, नगररचनाकार युवराज चव्हाण, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, के रहेजा समुहाचे सल्लागार किशोर भतीजा, इनॉर्बिट मॉलचे केंद्र प्रमुख धीरज व्यास उपस्थित होते.

स्वच्छतेत देशात आघाडीवर असणारे शहर म्हणून नवी मुंबईचा नावलौकिक असतांना प्रत्येक गोष्टीत पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपण्यावर महानगरपालिकेचा भर आहे. त्यादृष्टीने आज दिले जाणारे पावसाळी रेनकोट हे देखील वैशिष्टपूर्ण असून ते पुनर्प्रक्रियाकृत अर्थात रिसायकल प्लास्टिकपासून बनविले असल्याचे सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी सांगितले. कंत्राटदारांकडून स्वच्छताकर्मींना रेनकोट दिले जातात, आणखी एक पर्यायी रेनकोट स्वच्छताकर्मींना उपलब्ध व्हावा यादृष्टीने हा रेनकोट दिला जात असल्याचेही ते म्हणाले. सामाजिक बांधिलकी जपत इनॉर्बिट मॉलच्या वतीने नेहमीच सहयोग दिला जातो

## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा

# पनवेल महानगरपालिका शाळांतील मुलांना व्यासपीठ, व्यक्तिमत्व विकासाची संधी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, वक्तृत्वकौशल्य वाढवणे आणि सार्वजनिक व्यासपीठावर मोकळेपणाने बोलण्याची सवय लावणे या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक ०१, ०२ आणि ०४ मध्ये मोठ्या उत्साहात पार पडली. कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या वक्तृत्व स्पर्धेला विविध शाळेतील उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक राजू सोनी, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझाराव, उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रभाकर बहिरा, सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कोमल कोळी, देवांशू प्रभाळे अनिमेष पटवर्धन, हर्षल बहाडकर,जयेश चव्हाण, शिक्षक आदी उपस्थित होते.



या शाळांमधील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी माझं कुटुंब, माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, प्लास्टिक मुक्त भारत, स्वच्छ भारत, इंटरनेट वरदान की शाप अशा समकालीन व विचारांना चालना देणाऱ्या विषयांवर प्रभावी भाषणं दिली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि उत्साहाने आपले विचार सादर केले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये सार्वजनिक बोलण्याची भीती कमी झाली असून भाषणकलेचा पाया मजबूत झाला आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका शाळांतील मुलांना व्यासपीठ, व्यक्तिमत्व विकासाची संधी मिळाली आहे.

या वेळी सुमित झुंजारराव यांनी म्हंटले कि, विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी आणि आपले विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी असे मंच अत्यंत उपयुक्त आहेत. वक्तृत्व ही केवळ स्पर्धा नसून व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे. शाळेचे प्रमुख मुख्याध्यापक लोकनेते दि बा पाटील विद्यालय, श्री वाल्मिक राठोड म्हणाले की, अशी स्पर्धा विद्यार्थ्यांना शब्दांतून व्यक्त होण्याची संधी देते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवते. या संधीचा लाभ घेत विद्यार्थी पुढील फेरीत आणखी तयारीने सहभागी होतील. या फेरीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी कोशिश फाउंडेशन व महानगरपालिकेचे विशेष आभार मानले. पुढील टप्प्यात शाळा अंतर्गत आणि अंतर शालेय फेरी आयोजित करण्यात येणार असून या शाळांतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी पुढील फेरीसाठी तयारी सुरू केली आहे.

# लखनवी लंगडा आंबा बाजारात दाखल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सध्या जवळपास वर्षभर आंबा मौसम चालू असतो. त्यात प्रामुख्याने फेब्रुवारी महिन्यांपासून सुरु झालेला आंबा मौसम अजून सुरूच आहे. हापूस, पायरी, केशर, दशेरी, नीलम, बदामी, राजापुरी, तोतापुरी अशा विविध जातींचे आंबे एकामोगोमाग बाजारात येतच असतात. महाराष्ट्रात जसा देवगडचा हापूस तसा उत्तर भारतातील लखनवी आंबा प्रसिद्ध आहे. गेल्या आठवड्यापासून हा लखनवी बाजारात दाखल झाला आहे. उत्तर भारतात या आंब्याला चांगलाच मान असून मोठ्या प्रमाणात मागणी असते. सध्या मुंबईतदेखील या आंब्याला मागणी वाढू लागल्याचे सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्रसह कर्नाटकातदेखील लंगडा जातीच्या आंब्याचे उत्पादन घेतले जाते, मात्र या दोन्ही ठिकाणच्या आंब्याचा मौसम संपताच लखनवी आंबा बाजारात येतो. या आंब्याला ५५ ते ६० रुपये प्रतिकिलोचा दर बाजारात आहे. हा लंगडा अर्धा किलोहून अधिक वजनाचा एक नग असतो. आंब्याला बाजारात चांगलीच मागणी असून इतर लंगडा आंब्यापेक्षा खाण्यास हा आंबा चवदार असतो. बाजारात विविध आंब्याच्या सरासरी ५० ते ६० गाड्या येत असतात. त्यातील २० ते २५ गाड्या लखनवी आंबाच्या गाड्या बाजारात येत आहेत. एका कॅरेट मध्ये जवळपास २४ ते २५ किलो आंबे असतात. जवळपास १५ ऑगस्ट पर्यंत या आंब्याचा मौसम चालतो



# आदिवासी बांधव हा खरा निसर्गपूजक -डॉ. जयपूरकर

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

दऱ्या-खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी बांधवाचे पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रातील योगदान विशेष उल्लेखनीय असून विशेषतः ग्राम संस्कृती, लोक कला, लोक परंपरा जपणारा हा समाज बांधव निसर्गातील वाघ, नाग, गज, वड, पिंपळ, चंद्र, सूर्य यांना देवता म्हणून अगदी मनोभावे भजतो. यावरुन तो खऱ्या अर्थाने निसर्ग पूजक असल्याचे सिद्ध होते असे मत सामाजिक कार्यकर्ते, संशोधक प्रा. डॉ. हरिश्चंद्र सिंह जयपूरकर यांनी फणसवाडी, खारघर येथे व्यक्त केले.



भजनयात्री हंसारामबुवा नेरुळकर यांच्या पुण्यस्मरणाचे औचित्य साधून स्वर संगम सांस्कृतिक संस्थेच्या विद्यमाने व ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते अमृत पाटील नेरुळकर यांच्या विशेष पुढाकाराने फणसवाडी, खारघर या आदिवासी पाड्यावरील शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, छत्र्या, लेझीम, खेळाचे साहित्य व खाऊ वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मदन घेघाटे - अकोला, रवीभाऊ मडावी - यवतमाळ, युगंधरा ठाकूर - नेरुळ, मंगेश डुबे - चंद्रपूर, शेळके गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. अमृत पाटील हा माणुसकीचं, माणूस धर्माचं नातं सांगणारा शिक्षकातील एक सच्चा माणूस, सच्चा शिलेदार असून या माणसानं विशेषतः एकला चलो म्हणत गेली ३३ वर्षे आदिवासी बांधवांची नेमाने केलेली सेवा विशेष प्रेरणादायी असल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मदन घेघाटे यांनी यावेळी सांगितले.

आदिवासी बांधव हा खरा भूमिपुत्र असून तो प्रवासात सामावला जाणं गरजेचे आहे. यास्तव सकारात्मक दृष्टिकोनाची गरज असल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रविभाऊ मडावी यांनी या वेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मंगेश डुबे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामचंद्र म्हात्रे, पद्माकर वैती, आदिती पाटील, अथर्व पाटील यांनी मेहनत घेतली.

# पनवेल महापालिकेतर्फे ऊर्दू शाळा परिसरात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत**

‘सुंदर पनवेल, हरित पनवेल या संकल्पनेखाली पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येत आहे. उद्यान विभाग, प्रधानमंत्री आवास योजना विभाग आणि उर्दु शाळा यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम उर्दु शाळा परिसरात घेण्यात आला.



या कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आले तसेच पनवेल महानगरपालिकेच्या उर्दू शाळेमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते आंबा, चिकू, पेरू, सुपारी, लिंबू, बहावा, करंज, अशा विविध २५ रोपांचे रोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. याचा महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्थांनी, पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संघटनांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी विभागाचे प्रमुख हरेश जाधव, गजानन देशमुख, श्री.तेजानंद गभने, विजय कोर्से गावकर, संजना नायक, शोभा यादव उपस्थित होते.

# कुटुंबिनी उरण महिला संघातर्फे मंगळागौर

**उरण : बातमीदार**

समस्त महिलांना आत्मनिर्भर बनविण्याच्या दृष्टीने तसेच महिलांच्या विविध कला गुणांना, कला कौशल्यांना वाव देण्याच्या दृष्टीकोणातून, भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा जपला जावा या हेतूने कुटुंबिनी उरण महिला संघ या सामाजिक संस्थेतर्फे शनिवार २ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता शेप्स जिमखाना टेरेस उरण येथे मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांमधून सर्वोत्कृष्ट रंगभूषा, सर्वोत्कृष्ट उखाणा, सर्वोत्कृष्ट लक्षवेधी चेहरा, सर्वोत्कृष्ट नृत्य, सर्वोत्कृष्ट वेशभूषा, सर्वोत्कृष्ट शृंगार, सर्वोत्कृष्ट शृंगार व वेशभूषा (कुमारिका) महिला निवडण्यात येणार आहेत. त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विजयी स्पर्धेकांना रोख रक्कम व आकर्षक बक्षीसे दिली जाणार आहेत. दरवर्षी या मंगळागौर कार्यक्रमात महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग असतो. दरवर्षी या कार्यक्रमाला महिलांचा भरभरून प्रतिसाद मिळतो

## अभिनंदन!



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांची पक्षाच्या राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल टीआयपीएलचे एमपी त्यागी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# रायगड जिल्ह्यातील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**मुरूड** : तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीमधील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात जाहीर करण्यात आले.

या वेळी निवासी नायब तहसीलदार संजय तवर, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, संजय वानखडे, खुषाल राठोड, पंचायत समिती विस्तार अधिकारी प्रसाद माळी, कृषी विस्तार अधिकारी वसंत दळवी, प्रतिक पावसकर, धनंजय साक्रुडकर यांच्यासह राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

तहसीलदारांनी २४ ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० या कालावधीसाठी आयोजित थेट सरपंच आरक्षणाबाबत माहिती दिली. यामध्ये विहुर ग्रामपंचायत थेट सरपंचाकरिता सोडतीशिवाय अनुसूचित जाती महिला आरक्षण घोषित करण्यात आले. १७ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग सरपंचपदाकरिता सर्वांच्या समोर प्लास्टिक डब्यात १७ चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. या डब्यातून एका विद्यार्थ्याने चिठ्ठ्या उचचल्या. यामध्ये कोर्लई, मजगाव, शिघ्रे, साळाव, मिठेखार, मांडला; तर आंबोली ग्रामपंचायत सोडतीशिवाय नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण घोषित करण्यात आले.

आठ ग्रामपंचायतींमध्ये सर्वसाधारण आरक्षणाकरिता तेलवडे, चोरढे या दोन ग्रामपंचायतींची सोडत निघाली. बोर्ली, एकदरा राजपुरी सरपंच अनुसूचित जमाती खुला; तर वळके व तळेखार अनुसूचित जमाती महिला असणार आहे.

कोर्लई, मजगाव, शिघ्रे नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला; आंबोली, साळाव, मिठेखार, मांडला नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला सरपंच असणार आहे. सावली, उसरोली, आगरदांडा, वेळास्ते, काशिद, काकळघर सर्वसाधारण खुला आणि वावडुंगी, नांदगाव, भोईघर, चोरढे, तेलवडे सर्वसाधारण महिला असणार आहे.

या वेळी राजकीय पक्षांनी आपल्या समस्या मांडल्या. त्यावर तहसीलदार आदेश डफळ यांनी सकारात्मक उत्तर दिले आणि समस्या दूर केल्या.



**सुधागड** : तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची प्रक्रिया पाली भक्त निवास क्रमांक १ येथे पार पडली. तहसीलदार सुधागड उत्तम कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत ग्रामपंचायतींना प्रवर्गनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. अधिसूचनेनुसार २०२५ ते २०३० कालावधीसाठी सुधागड तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्ग यांच्यानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

**असे आहे आरक्षण**

अनुसूचित जाती (महिला) : परळी, अनुसूचित जमाती: महागाव, पाच्छापूर, राबगाव, कळंब, कुंभारशेत; अनुसूचित जमाती (महिला) : आपटवणे, नेणवली, चिवे, माणगाव बु., खवली, नांदगाव; नामाप्र : गोमाशी, रासळ, सिध्देश्वर बुद्रुक, शिळोशी; नामाप्र (महिला) : आतोणे, नवघर, व्हाड जांभुळपाडा, चंदरगाव, चिखलगाव; सर्वसाधारण : नागशेत, उद्धर, अडूळसे, ताडगाव, खांडपोली, घोटवडे, नाडसूर; सर्वसाधारण (महिला) : तिवरे, भाजे, हातोंड, दहिगाव, वाघोशी.

**तळा** : तालुक्यातील २५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात तहसीलदार स्वाती पाटील यांनी जाहीर केली. या आरक्षण सोडतीमध्ये कही खुशी, कही गम चित्र दिसले.

या वेळी नायब तहसीलदार श्री. पालांडे, श्री. टेंबे, श्री. पाटील, अनेक पक्षांचे पक्षप्रमुख, कार्यकर्ते व विविध गावातील सरपंच पदाचे इच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२०२५ ते २०३० या कालावधीमध्ये २५ ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जातीसाठी २ जागा, अनुसूचित जमातीसाठी ४ जागा, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ७ जागा, सर्वसाधारणसाठी १२ जागा असे आरक्षण निश्चित करण्यात आले.

**असे आहे आरक्षण**

अनुसूचित जाती : निगुडशेत, अनुसूचित जाती महिला : वांजळोशी, अनुसूचित जमाती : मेढे, पिटसई, अनुसूचित जमाती महिला : बोरघर हवेली, महागाव; नामाप्र : मालुक, वरळ, रोवळे, तळेगाव; नामाप्र महिला : चरई खुर्द, शेणवली, गिरणे; सर्वसाधारण : काकडशेत, पढवण, भानंग, मांदाड, रहाटाड; सर्वसाधारण महिला : मजगाव, उसर खुर्द, पन्हेळी, सोनसडे, वानस्ते, कर्नाळा/फळशेत, वाशी हवेली.

**पोलादपूर** : तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची गेल्या २५ एप्रिल २०२५ रोजी सोडत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात काढण्यात आल्यानंतर आता कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये दुसऱ्यांदा सोडत काढण्यात आली. या वेळी तहसीलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट व्यासपीठावर उपस्थित होते.

अनुसूचित जाती महिलासाठी तीन सरपंचपदांचे आरक्षण महाळुंगे आणि कापडे खुर्द व माटवण अनुसूचित जाती खुला, अनुसुचित जमातीसाठी तीन सरपंच पदांचे आरक्षण देवपूर महिला, कापडे बुद्रुक, भोगाव खुर्द, नामाप्र सर्वसाधारण सरपंचपदाचे आडावळे बुद्रुक, पैठण, तुर्भे खोंडा, ओंबळी, वझरवाडी या पाच ग्रामपंचायतींचे आरक्षण, तर नामाप्र महिलांसाठी धामणदिवी, परसुले, गोळेगणी, तुर्भे खुर्द, काटेतळी, कालवली या सहा ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षित करताना धारवली, बोरघर, पांगळोली, वाकण, दिविल, चरई, मोरसडे, पळचिल, कुडपण बुद्रुक, लोहारे, चांभारगणी बुद्रुक, कोतवाल खुर्द या १२ ग्रामपंचायती; तर बोरज, पार्ले, उमरठ, मोरगिरी, देवळे, कोंढवी, तुर्भे बुद्रुक, महालगूर, गोवेले, सवाद, बोरावळे, कोतवाल बुद्रुक, सडवली या १३ ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण सर्वसाधारण जाहीर झाले.

बोरावळे नामाप्रचे आरक्षण बदलून सर्वसाधारण खुले झाले आहे, तर गोवेले सर्वसाधारण महिला आरक्षण बदलून सर्वसाधारण खुले आरक्षण झाले आहे. या वेळी सोडत काढण्यासाठी जनसेवा विद्यालयाची एक विद्यार्थिनी उपस्थित होती.

**माणगाव** : तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंचपदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालय येथे पार पडली. या वेळी तालुक्यातील ७४पैकी ३७ ग्रामपंचायतींवर सरपंचासाठी महिला आरक्षण निघाले. त्यामुळे या ग्रामपंचायतींवर महिलाराज असणार आहे.

**असे आहे आरक्षण**

अनुसूचित जाती खुला : निजामपूर, नागाव; अनुसूचित जाती महिला : साई, विळे; अनुसूचित जमाती खुला : मढेगाव, करंबेळी, पाणसई; अनुसूचित जमाती महिला : साजे, पळसगाव, दाखणे, वडगाव; नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला : सणसवाडी, विहुले, रातवड, पन्हळघर बू, वरचीवाडी, चांदोरे, वणी मलईकोंड, फलाणी, हरकोल, देवळी; नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : भागाड, चिंचवली, गांगवली, कडापे, भुवन, देगाव, शिरवली तर्फे निजामपूर, कुंभे, मांजरवणे, पोटनेर; सर्वसाधारण प्रवर्ग खुला : तळाशेत, दहिवली त. गोवेले, पुरार, उणेगाव, कविळवहाळ बु., पहेल, टेमपाले, बामणोली, पन्हळघर खुर्द, भाले, सुरव त. तळे, निळज, होडगांव, शिरसाड, टोळखुर्द, साळवे, लोणेरे, वावेदिवाळी, मोर्बा, गोवेले, रवाळजे, वारक; सर्वसाधारण प्रवर्ग महिला : वडवली, दहिवली कोंड, पाटणूस, काकल, लोणशी, अंबले, तळेगाव त. गोरेगाव, पेण त. तळे, जिते, गोरेगाव, कुमशेत, कोस्ते खुर्द, पळसप, मांगरुळ, लाखपाले, नांदवी, खरवली, न्हावे, मुठवली त.तळे, डोंगरोली, साले.

**श्रीवर्धन** : तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीसाठी (सन २०२५ ते २०३०) सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. तालुक्यातील एकूण ४३ ग्रामपंचायतींसाठीचा तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांच्या स्वाक्षरीने तक्ता प्रसिद्ध झाला असून यामध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती-जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच महिलांसाठी राखीव जागा ठरवण्यात आल्या आहेत.

एकूण ४३पैकी १८ ग्रामपंचायतींमध्ये महिलांसाठी (सर्वसाधारण व मागास प्रवर्ग) सरपंचपद राखीव राहणार आहे. त्यात आदगाव, दिवेआगर, मेघरे, वाळवटो, वांजळे, वाकळघर, वावे तर्फे श्रीवर्धन, बागमांडला, नागलोली, दांडा, मारळ, गौळवाडी, काळीजे अशा ग्रामपंचायतींमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण आहे. कुडगाव, खारगाव, शेखाडो, हरवित, गाणी, बोलीपंचतन, भोस्ते या गावांमध्ये मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण ठरवण्यात आले आहे.

अनुसूचित जमातींसाठी खुल्या आणि महिलांसाठी मिळून एकूण सात ग्रामपंचायती आहेत. दिधो, रानवलो, भरडखोल, दांडगुरी या गावांसाठी अनुसूचित जमाती खुले आरक्षण आहे, तर कुडगाव व खारगाव अनुसूचित जमाती स्त्री आरक्षणाखाली आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १२ जागा ठरल्या असून त्यात कोलमांडले, जसवलो, सर्वे, खुजारे, वडघर, निगडी, हरेश्वर, शेखाडो, हरवित, गाणी, बोलीपंचतन, भोस्ते ही गावे समाविष्ट आहेत.

सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी १८ ग्रामपंचायती राखीव असून कारोवणे, गालसुरे, कुडको, गुळथे, चिखलप, सायगाव, साखरोणे, वेळास, शिस्ते, वडवली, आराठी, काले अशा गावांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार संधी मिळणार आहे.

**चौक** : खालापूर तालुक्यातील ४५ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण तहसीलदार अभय चव्हाण यांनी गुप्त चिठ्ठीद्वारे जाहीर केले आहे. एप्रिल २०२५ मध्ये सरपंच पदाचे जाहीर करण्यात आले होते, त्यानंतर आता पुन्हा आरक्षणाची प्रक्रिया घेण्यात आली.

**असे आहे आरक्षण**

अनुसूचित जाती : साजगाव, माडप; अनुसूचित जाती (महिला) : तुपगाव; अनुसूचित जमाती : बोरगाव खुर्द, वावर्ले, जांबरुंग, वावोशी; अनुसूचित जमाती महिला : कलोते, नारंगी, वरोसे, उंबरे, दुरशेत; सर्वसाधारण : खानाव, खरिवली, आपटी, नडोदे, चौक, होराळे, आत्करगाव, माजगाव, चिलठण, वासांबे, कुंभिवली; सर्वसाधारण महिला : बीड खुर्द, आसरे, नावंडे, वावंढळ, माणकिवली, हाळ खुर्द, सावरोली, वडवळ, वडगाव, लोधीवली; नामाप्र : गोरठण बु., ठाणेन्हावे, इसांबे, नंदनपाडा, देवन्हावे, जांभिवली; नामाप्र (महिला) : शिरवली, चावणी, टेंभरी, तांबाटी, होनाड, चांभार्ली.

**कर्जत, नेरळ** : कर्जत तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतींसाठी सरपंचपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. सोडतीवेळी प्रांत अधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

**असे आहे आरक्षण**

अनुसूचित जाती : मांडवणे आणि कोंडीवडे (महिला), अनुसूचित जमाती : बोरिवली, वारे, साळोख तर्फे वरेडी, पोशीर, रजपे, शेलू, खांडपे, पाषाणे; अनुसूचित जमाती (महिला) : भालिवडी, कशेळे, अंजप, बीड बुद्रुक, कळंब, शिरसे, आसल, वैजनाथ; नागरिकांचा मागास प्रवर्ग : अंभेरपाडा, मोगरज, ओलमण, खांडस, भिवपुरी, जामरुंग, पिंपळोली, नेरळ; नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) : नांदगाव, पळसदरी, वरई तर्फे नीड, हुमगाव, पाथरज, जिते, पाली खलाटी; सर्वसाधारण : तिवरे, ममदापूर, दहिवली तर्फे वरेडी, पोटल, वदप, गौरकामत, चिंचवली, नसरापूर, वेणगाव, उकरूळ; सर्वसाधारण (महिला) : उमरोली, कोल्हारे, किरवली, सावेळे, माणगाव तर्फे वरेडी, सावळे, वाकस, हालिवली, वावळोली, मानिवली, दामत, कडाव.

---

## मजुरांअभावी भात लागवड खोळंबली



**खोपोली : प्रतिनिधी**

विश्रांतीनंतर पावसाचे दमदार आगमन झाल्यामुळे बळीराजाला दिलासा मिळाला आहे. भात लागवड करण्यासाठी राब चांगले तयार झाले आहेत, मात्र मजुरांअभावी भात लागवड कामे खोळंबळी आहेत.

बळीराजा भात लागवड करण्यासाठी सज्ज झाल्याचे चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे. दिवसभरामध्ये पावसाच्या सरी येत असून जिकडे तिकडे भात लागवड सुरु असून या कामासाठी मजुरांची मनधरणी सुरु आहे. ज्यांची भातशेती अल्प आहे. त्यांची लागवड पूर्ण झाली आहे, मात्र काहींची कामे मजुराअभावी खोळंबली आहेत. मिळेल त्या मजुरांना घेऊन भात लागवड गेल्या आठवड्यापासून सुरु झाली आहे.

गेले अनेक दिवस नेमक्याच पडणाऱ्या पावसाचे मंगळवारी दमदार आगमन झाल्याने शेतकरी सुखावला असून तालुक्यातील ग्रामीण भागात भात लागवड करण्यासाठी वेग घेतलेला चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

पावसाच्या अगमनाने अनेक ठिकाणी पावसाचे पाणी तुंबले असून ग्रामीण भागात नालेही दुथडी भरून वाहू लागले आहे. शिवाय शेतामध्ये मुबलक पाणी जमा झाले, मात्र मजुरांच्या अभावी भात लागवड खोळंबली आहे. यामुळे जोमाने बळीराजा शेतीच्या कामात व्यस्त झाला असताना मजुरांअभावी खोळंबा झाला आहे.

## आदर्श शेतकरी पुरस्कार सोहळा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभागातील बाळसई येथील प्रगत शेतकरी मधुकर ठमके व शेतपळस येथील महादेव डाकी यांना नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनतर्फे आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

पळस येथे शुक्रवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची प्रमुख उपस्थिती; त्याचप्रमाणे रोहा गटविकास अधिकारी शुभदा पाटील, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, पं.स. कृषी अधिकारी रणजित लवटे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, माजी जि.प. सदस्य नरेंद्र जैन, माजी पं.स.सदस्य डॉ. राजेंद्र धात्रक, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, पळस सरपंच सुप्रिया डाकी आदी उपस्थित राहणार आहेत.

## बोरघर स्मशानभूमीचे काम लवकरच होणार सुरू

**धाटाव : प्रतिनिधी**

बोरघर गावातील स्मशानभूमीच्या विकासासाठी मंजूर झालेल्या निधीच्या वापराबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. या विकासनिधीला डिसेंबर २०२५पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे उपअभियंता डेप्युटी इंजिनियर जांभळे यांनी दिली.

गेल्या काही दिवसांपासून स्मशानभूमीच्या विकासकामासंबंधी निधी वेळेत वापरण्यात न आल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू होती. त्या संदर्भात स्पष्टीकरण देताना रायगड जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे उपअभियंता डेप्युटी इंजिनियर जांभळे यांनी सांगितले की, या विकास निधीवर कोणताही धोका नाही. कामासाठी आवश्यक मुदत डिसेंबर २०२५पर्यंत वाढविण्यात आली आहे. संबंधित कामकाज नियोजनानुसार पूर्ण केले जाईल.

**विकासनिधीला डिसेंबरपर्यंत मुदतवाढ**



दरम्यान, या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य संजय भगत यांनीही ग्रामस्थांना आश्वस्त करताना सांगितले, स्मशानभूमीच्या विकासासाठी मंजूर निधी वाया जाणार नाही. लवकरच काम सुरू होईल. प्रशासकीय प्रक्रिया सुरू असून लवकरच प्रत्यक्ष काम सुरु होईल. स्थानिक पातळीवर वाद निर्माण असल्यामुळे कामाला विलंब झाला, परंतु तीदेखील चर्चा अंतिम टप्प्यात असून लवकरात लवकर आमदारमहोदयांच्या विकास निधीतून काम केलेले असेल.

तळाघर ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका अर्चना पाटील यांनी, बोरघर येथे स्मशानभूमी शेडसाठी मूलभूत सुविधा म्हणून काम केले जाईल, अशी माहिती दिली.

स्मशानभूमीच्या जागेचा खराब रस्ता, संरक्षक भिंतीचा अभाव, पावसात होणारी चिखलवाढ यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी विकासकामांसाठी निधीच्या वापरावर जोरदार मागणी केली होती. त्यामुळे हा निधी वेळेत आणि योग्य पद्धतीने वापरला जावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

---

## विशेष मध्यस्थी मोहिमेचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व मध्यस्थी समुपदेशन प्रकल्प समिती यांनी १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत न्यायालयातील प्रलंबित वाद मध्यस्थीद्वारे समझोता करुन तडजोडीने मिटविण्याकरिता विशेष मोहीम जाहीर केली आहे. पक्षकारांनी याचा लाभ घ्यावा.

प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे पाठविण्याकरिता संबंधित न्यायालयास विनंती करावी अथवा जिल्हा मध्यस्थी केंद्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड येथे संपर्क साधावा. अधिक माहितीकरिता रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, विधी सेवा सदन जिल्हा न्यायालय परिसर, टिळक रोड, अलिबाग (दूरध्वनी क्र.०२१४१-२२३०१०, मो.क्र.८५९११९०३६०६), तालुका विधी सेवा समित्या पनवेल (दू.क्र.०२२-२७४५३०१९), माणगाव (दू.क्र.०२१४०-२६३४७०), पेण (दू.क्र.०२१४३-२५५५२०), कर्जत दू.क्र. (०२१४८-२२२२१७), खालापूर (दू.क्र.०२१९२-२७५२२८), उरण (दू.क्र.०२२-२७२२२४११), रोहा (दू.क्र.०२१९४-२३२२९९), पाली (दू.क्र.०२१४२-२४२३८२), महाड (दू.क्र.०२१४५-२२२३३२), मुरूड (दू.क्र.०२१४४-२७४०३८), (श्रीवर्धन दू.क्र.०२१४७-२२२५३४) येथे संपर्क साधावा.

# राज्य कबड्डी दिन उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचा २५वा कबड्डी दिन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने पोयनाड येथील जय मंगल कार्यालयात मुसळधार पावसातदेखील उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने जुने नवे खेळाडू, कार्यकर्ते व कबड्डीप्रेमी एकत्रत आले.

राज्य कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष माजी खासदार गजानन किर्तीकर, सचिव बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, शकुंतला खटावकर, माजी सरकार्यवाह मोहन भावसार, माजी सचिव आस्वाद पाटील, कार्यकारिणी सदस्य रवींद्र देसाई, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशचे कार्याध्यक्ष संजय पाटील, कार्यवाह डॉ. चित्रा पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण झाला.

खेळाडू व नंतर पूर्ण आयुष्य संघटक म्हणून कबड्डीमहर्षी बुवा साळवींच्या नावाने दिलेला कबड्डी जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना



वयोवृद्ध रामभाऊ घोडके यांना गहिवरून आले. कृतज्ञता पुरस्कार स्वीकारताना जया शेट्टी, ज्येष्ठ खेळाडू पुरस्कार स्वीकारताना जीवन पैलकर, ज्ञानेश्वर कुंभार, कुमुद कागलकर, दिलीप देवलकर, नलिनी पवार, चंद्रकांत काटे, तर श्रीमयोगी पुरस्कार स्वीकारताना जे.जे. पाटील, प्रभाकर लकेश्री यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

या निमित्ताने या दोन वर्षात महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मिळालेल्या पुरुष व महिलांचा तसेच जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित शकुंतला खटावकर यांचादेखील यथोचित गौरव करण्यात आला. कबड्डी या खेळाला जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळवून देणारे विठ्ठल देवकाते, सुनील सकपाळ यांचाही सन्मान करण्यात आला. मिलिंद पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

## चोंढी येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींची जयंती साजरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे साजरी करण्यात आली. या वेळी ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी यांनी, युवावर्गाने संविधानिक मूल्यांवर अधिष्ठित राष्ट्रकारणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

भारत सरकारच्या क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालयाच्या अंतर्गत मेरा युवा भारत, अलिबाग-रायगड आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या स.म. वडके शैक्षणिक संकुलात 'डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी : १२५ वर्षांचा वैचारिक वारसा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

व्यासपीठावर शैक्षणिक संकुलाचे उपमुख्याध्यापक बी.जी. पाटील, सहाय्यक शिक्षक जे.पी. पेढवी, व्ही.एम. काटे, जे.डी. राठोड, बी.एन. शिंदे, ओएसिस संस्थेचे सहसचिव साहिल साळुंखे, वेदांती महाडिक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चोंढी शैक्षणिक संकुलाचे सहाय्यक शिक्षक पी.बी. सोनवणे व प्रास्ताविक ए.पी. कर्वे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार एस.ए. लोखंडे यांनी मानले.

# इंग्लंडच्या विजयाला गालबोट

## ■ आयसीसीकडून डब्ल्यूटीसी गुणांना कात्री

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडने लॉर्ड्स कसोटीत भारताचा २२ धावांनी पराभव करून पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. तिसऱ्या कसोटीच्या या विजयाला दोन दिवस पूर्ण होण्याआधीच आयसीसीने इंग्लंडला मोठा दणका दिला आहे. लॉर्ड्स कसोटीत षटकांची गती कमी राखल्याबद्दल इंग्लंडवर जबर दंड ठोठावण्यात आला आहे.

आयसीसीने सामन्याच्या शुल्काच्या १० टक्के दंड आकारला असून जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) गुणतालिकेतील त्यांच्या दोन गुणांनाही कात्री लावली आहे. यामुळे इंग्लंडचा संघ डब्ल्यूटीसी गुणतालिकेत एका स्थानाने घसरून तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. टीम इंडिया सध्या या गुणतालिकेत ३३.३३ टक्केवारीसह चौथ्या स्थानी आहे. या गुणकपातीनंतर डब्ल्यूटीसी गुणतालिकेत इंग्लंडचे गुण २४वरून २२वर आले आहेत. परिणामी त्यांच्या विजयाची टक्केवारी ६६.६७वरून ६१.११ झाली आहे. याचा थेट फायदा श्रीलंकेला झाला असून ६६.६७ विजयी टक्केवारीसह त्यांनी इंग्लंडला मागे टाकत दुसरे स्थान मिळले आहे.

आयसीसीच्या आचारसंहितेतील कलम २.२२नुसार षटकांची गती कमी राखल्यास, प्रत्येक कमी षटकासाठी खेळाडूंना सामन्याच्या शुल्काच्या पाच टक्के दंड आकारण्याची तरतूद आहे तसेच डब्ल्यूटीसी स्पर्धेच्या नियमांमधील कलम १६.११.२नुसार प्रत्येक कमी षटकासाठी संघाचा एक गुण कापला जातो.







## ऋषभ पंतला भारताचा नवा कसोटी ‘सिक्सर किंग’ बनण्याची सुवर्णसंधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत हा आणखी एका ऐतिहासिक मैलाचा दगड गाठण्याच्या अत्यंत जवळ पोहचला आहे. इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर कसोटीत मैदानात उतरताच पंतला भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज होण्याची नामी संधी आहे. सध्या पंतच्या नावावर ४६ कसोटी सामन्यांतील ८१ डावांत ८८ षटकारांची नोंद आहे. या यादीत तो भारताचा वनडे कर्णधार रोहित शर्माच्या बरोबरीने आहे. हिटमॅननेदेखील कसोटीत ८८ षटकार खेचले आहेत.

रोहितच्या बरोबरीनंतर पंतचे पुढील लक्ष्य भारताचा माजी आक्रमक सलामीवीर वीरेंद्र सेहवाग आहे. सेहवागच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ९१ षटकार आहेत. म्हणजेच जर पंत मँचेस्टर कसोटीत किमान चार षटकार मारण्यात यशस्वी झाला तर तो सेहवागला मागे टाकून भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनेल.

विशेष म्हणजे, पंतने ही कामगिरी अवघ्या ४६ कसोटी सामन्यांमध्येच साध्य केली आहे, तर रोहित आणि सेहवाग यांनी हे आकडे बरेच अधिक सामने खेळून गाठले होते. पंतने हा विक्रम आपल्या नावावर केला, तर तो असा विक्रमन प्रस्थापित करेल, जो येत्या अनेक वर्षांमध्ये इतर फलंदाजांना मोडणे सोपे नसेल. कसोटी क्रिकेटमध्ये इतक्या कमी सामन्यांमध्ये षटकारांचा हा टप्पा गाठणे ही मोठी उपलब्धी आहे.

## टी-२० क्रमवारीत शफाली वर्माची मुसंडी

**दुबई** : भारतीय महिला संघाने इंग्लंड दौऱ्यावरील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऐतिहासिक विजय नोंदवला. पहिल्यांदा इंग्लंडच्या मैदानात बाजी मारण्यासाठी लेडी सेहवाग अर्थात शफाली वर्मा हिने मोलाची भूमिका बजावली. या कामगिरीचा आयसीसी महिला टी-२० क्रमवारीत तिला फायदा झाला असून ती चार स्थानांनी उंच उडी मारत नवव्या स्थानावर पोहचली आहे. उपकर्णधार आणि सलामीची बॅटर स्मृती मानधना तिसऱ्या स्थानावर आहे.



















